म. ग्रं. सं.
विषय : ........ Coll. ch
दा. क्र. : ९५८९४

९५८९४

IRBK-0115814
IRBK-0115814

# श्री सन्त नामदेव

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १५८१४ नों दि ९.३.५५
वि. ६१ : ८१

मॅजेस्टिक प्रकाशन
गिरगांव, मुंबई ४

मॅजेस्टिक प्रकाशन

IRBK-0115814

IRBK-0115814

संस्कारित आवृत्ती पहिली
जुलै १९७४
© गो. नी. दाण्डेकर

**प्रकाशक**
अशोक केशव कोठावळे
३१६, प्रसाद चेम्बर्स
गिरगाव नाका, मुंबई ४

**मुद्रक**
चिं. म. महाबळ
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०

**चित्रे**
हवालदार
**मांडणी**
अरुण घाटे

**किंमत चार रुपये**

*पायरीच्या चिन्यास......*

## अनुक्रम


| | |
|---|---|
| पंढरीचा पांडुरंग | १ |
| थोडी कुटुंब–कथा | ४ |
| गोणाईने नवस केला | ६ |
| दासी जनी | ७ |
| बाल्य | ८ |
| देव जळला हो | ९ |
| नामयाचं लगीन | १६ |
| देववेडा | १८ |
| विठ्ठलरंगी रंगला | १९ |
| ऐसा कैसा कुलक्षण | २० |
| मेहुण्यांना पाहुणचार | २२ |
| देवपूजा | २५ |
| परीक्षा | २७ |
| गुरुकृपा | ३४ |
| देवाची ओळख | ३६ |
| कीर्तनाचा रंग | ३८ |
| तीर्थयात्रा | ३९ |
| उचंबळे कूप | ४१ |
| फिरविले देऊळ | ४४ |
| ज्ञानोबा–समाधी | ४५ |
| दीप मावळला | ४७ |
| राहिल्या त्या कीर्ती | ५० |
| अभंग रचना | ५३ |
| नामा झालासे उदास | ५६ |
| पंजाब यात्रा | ५७ |
| पायरीचे चिरे | ५८ |

# १. पंढरीचा पांडुरंग—

पांडुरंगाची एक गोमटी आरती आहे. जयदेव जयदेव जय पांडुरंगा. तीत म्हटलं आहे, की हे परब्रह्म पुंडलीकाच्या भेटीसाठी पंढरीस आलं. पुंडलीकानं काय केलं, तर मातापित्यांची सेवा केली.

तरुणपणी पुंडलीक मोठा खट्याळ होता. बाइलीला पलंगावर बसवायचा. तिचं हवं नको पाहायचा. तिला आंघोळीला गरम पाणी. नेसायला जरीचं पाटाव. खायला प्यायला चांगलं–चुंगलं. ती कण्हू लागली, की याचा जीव घाबरा व्हायचा. तिला जांभया येऊ लागल्या, की हा तिला पलंगावर झोपवून तिचे पाय दाबीत बसायचा. बायको म्हणजे त्याचा जीव की प्राण. बायको म्हणजे सर्वस्व, अग अग बाइले, सर्व तुला वाहिले !

आणि आईबाप !

त्यांनी केरवारे करावेत. धुणीभांडी उरकावीत. स्वयंपाकपाणी सारावं. ही दोघं राजाराणी जेवल्यावर उरलं सुरलं शिळंपाकं खावं. ही पोपटमैनेची जोडी झोपली, की मग ओसरीवर फाटक्या वाकळेवर अंग टाकावं. मनी म्हणावं, की आमच्या बाळाचं भलं होऊ दे !

एकदा बायकोच्या हट्टावरून पुंडलीक यात्रेला निघाला. बायकोला कसं पायी चालवायचं ? मग तिला घेतली खांद्यावर. सगळं सामान बांधलं दोन बोचक्यांत. ती बोचकी दिली आई-बापसांच्या डोक्यांवर. पुढं बायलीला खांद्यावर घेऊन हे राजेश्री चाललेले. मागं सामानाची ओझी घेऊन म्हातारी आईबाप.

चालता चालता संध्याकाळ झाली. एका आश्रमापाशी ही मंडळी येऊन पोचली. तिथं रात्रभर राहिली. पहाटे उठून पुंडलीक पाहातो, ती दोघी मोठ्या घवघवीत, सुस्वरूप बाया आश्रमाचं अंगण झाडून काढताहेत. सडा घालताहेत. रांगोळ्या रेखताहेत.

त्यानं कुतूहलानं त्या दोघींना पुसलं,

'बायांनो, तुम्ही कोण ?'

तर म्हणे, आम्ही गंगा यमुना.

'म्हणजे खऱ्याखुऱ्या गंगायमुना ?'

'हो हो, त्याच त्या.'

'मग इथं केरवारे कशासाठी करता ?'

'त्याचं काय आहे पुंडलीका, की हा आश्रम ज्या ऋषीचा आहे ना, तो आईबापांचा भक्त आहे. त्यांची सेवा करीत असतो. अगोदर त्यांना जेवू घालतो. ती म्हातारा म्हातारी झोपली, की मग त्यांच्या पायांशी आपण झोपी जातो. त्यांची पावलं चेपून झाल्यावर मग.'

पुंडलीकानं मोठं नवल केलं. तो बोलला,

'पण तुम्ही इथले केरवारे काय म्हणून करता ?'

'काय करावं पुंडलीका ? या ऋषीचा आश्रम आहे पवित्र. इतका पवित्र' की सांगता पुरवत नाही. तुझ्यासारखी पापी माणसं आम्हांपाशी येतात. आमच्या जळी स्नानं करतात. त्यानं आमची अंगं मळीण होतात. या आश्रमाची धूळ अंगावर उडाली, की आम्ही पुन: पवित्र होतो. कळलं ?'

पुंडलीक चरकला. त्याच्या डोळ्यांत अंजनच घातलं गेलं. तो आपल्या गावी परतला. पंढरपूर हे त्याच्या गावाचं नाव. तिथं पोचताच त्यानं आईबापांची सेवा करायला प्रारंभ केला. अशी सेवा, की अन्त नाही. पार नाही.

आईबाप कोमेजून विचारीत,

'अरे बाळा, कशासाठी हे सगळं ?'

पुंडलीक बदलला होता. तो पहिला राहिला नव्हता. त्याला वाटे, कसे आपण जन्मलो आईबापांच्या पोटी ! जन्मभर त्यांना दु:ख दिलं. सुखाची सावली देखील कधी दिसू दिली नाही. आता चूक ध्यानी आली. तेव्हा त्यांची सेवा करताना अगदी आपल्या जिवाकडेही पाहायचं नाही. मग बाइलेची काय कथा !

तो नम्रपणं म्हणे,

'हे मला केलं पाहिजे.'

मग रात्रंदिवस तो ध्यास. आईबापाला सुख कसं लागेल, ती काळजी. तो स्वतः रांधायचा. पाटावर बसवून त्यांना जेवू घालायचा. भांडी स्वतः घासायचा. त्यांच्यासाठी मऊसूत अंथरूण घालायचा. हाती धरून देवाला न्यायचा. घरी परतली, की त्यांचे पाय दाबायचा. अशी सेवा चालवली, की इतक्या दिवसांचं उट्टं फेडून टाकलं. अशी सेवा कधीही कुणी कुणाची केली नाही !

अन् एक्या दिशी एक नवल घडलं.

पुंडलीकाच्या दारी सावळं परब्रह्म येऊन उभं ठाकलं. त्याला हाक मारून म्हणालं,

'पुंडलीका, मी आलो आहे.'

पुंडलीकानं काय केलं असेल ? त्यानं अगदी ढुंकूनसुद्धा कोण आलं ते पाहिलं नाही. देव ताटकळला ताटकळला, अन् पुनः हाक मारून म्हणाला,

'पुंडलीका रे ! मी परमात्मा तुझ्या दारी आलो आहे. मातापित्यांची तू ही जी सेवा चालवली आहेस, तीमुळं मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. पुंडलीका रे !'

तरी पुंडलीक आपला सेवेमध्ये दंग. आईवडिलांचे पाय चेपीत होता. ते चेपून झाले, तेव्हा कुठं त्यानं मागं वळून पाहिलं. म्हणाला,

'कोण आहे ?'

'मी–प्रत्यक्ष परमात्मा.'

'कशासाठी आला आहेस ?'

'तुझ्यावर प्रसन्न झालो म्हणून.'

'हे बघ परमात्म्या, मला आता मुळीच वेळ नाही बघ. आईवडिलांची स्नानाची वेळ झाली. ती चुकता उपेगाची नाही. मला त्यांना घेऊन चन्द्रभागेवर गेलं पाहिजे.'

'अरे पण मग—'

'तुला तोपर्यंत वेळ असेल, तर उभा राहा तिथंच. हे एवढं आईवडिलांना स्नान घालून झालं, की मग मी तुझी गाठ घेईन. तुला उभं राहायला

काय देऊ ? हां, असं कर. ही वीट घे. इच्यावर उभा राहा. मी येईपर्यंत उभा राहा बरं का ! नाहीतर जाशील कुठं वैकुंठात ! '

देवाला उभं राहायला पुंडलीकानं एक वीट भिरकावली. तीवर देव उभा राहिला. कर कटावरी ठेवोनियां. पुंडलीकानं म्हाताऱ्या आईबापांना अलगत उचललं. चन्द्रभागेवर निघाला. जाता जाता तो विचार करू लागला, की अनायासे हा देव आला आहे. आपण परतेपर्यंत तो इथंच थांबणार आहे. कुठं जाणार नाही.

वा वा ! काय युक्ती आहे ! आपण परत फिरूच नये, म्हणजे झालं ! देव आपली वाट पाहात इथंच विटेवर उभा राहील ! भक्तांना त्याचं दर्शन घडेल.

आणि पुंडलीक चंद्रभागेवरून परतलाच नाही. आईवडील निजधामाला गेली, पुंडलीकानं चन्द्रभागेच्या वाळवंटात समाधी घेतली. देव आपला त्याची वाट पाहात तिथंच उभा आहे. विटेवरी उभा, कटावरी हात. काय मौजेचा पंढरीनाथ.

त्या गावाचं नाव पंढरपूर !

त्याच पंढरपूरची आणि त्याचं पंढरीनाथाच्या भक्ताची—नामदेवाची ही कथा.

---

## २. थोडी कुटुंब-कथा

मराठवाड्यातला परभणी जिल्हा. त्या जिल्ह्यात औंढ्या नागनाथ या नावाचं एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग—म्हणजे देवाधिदेव महादेवाचं स्थान. अशी ही ज्योतिर्लिंगं एकूण बारा. त्यांतलं औंढ्या नागनाथ.

नागनाथापासून पाच कोसांवर नरसी नावाचं गाव. नरसीपासून पाच-दहा कोसांवर दुसरं गाव, ब्राह्मणी नावाचं. ती दोन्ही गावं नरसीब्रामणी

म्हणून ओळखली जात. तर त्या नरसीला यदुशेट रेळेकर या नावाचा शिंपी राहात असे. धंदा? कापडं शिवणं. ती घोड्याच्या पाठीवर लादून गावोगावीच्या बाजारहाटांतून हिंडणं. तिथं ती विकणं.

त्या यदुशेटचा मुलगा हरिशेट. त्याचा गोपालशेट. त्याचा गोविंदशेट. ही सगळी मंडळी देवाची भक्त. सचोटीनं व्यापार करावा. मिळेल तेवढ्यात कुटुंबाचा चरितार्थ चालवावा. अतिथि-अभ्यागताचं स्वागत करावं. गाईगुजी दारी उभी राहिली, तर तिच्या मुखी घास घालावा. कुणी तहानेला ठाकला, तर त्याला गूळपाणी द्यावं.

योगायोगानं या कुटुंबानं नरसीबामणी सोडली अन् ते पंढरपुरी येऊन राहिलं. गोविंदशेटला मुलगा झाला, त्याचं नाव नरहरशेट. नि नरहरशेटच्या पुताचं नाव दामाशेट.

दामाशेट लग्नाचा झाला. तेव्हा नरहरशेटींनी कल्याणीच्या गोमाजीशेटशी सोयरीक जुळवली. त्याची लेक गोणाई दामाशेटची वाईल म्हणून उंबरठ्यावरचं माप उलंडून आली. दोघांचा सुखाचा संसार सुरू झाला.

पंढरपुरी पांडुरंगाचं भलं थोरलं राऊळ. त्याच्या बाहेरच्या भिंतीला एक शिलालेख आहे. त्याचं नाव चौऱ्यांशीचा शिलालेख. त्यात विठ्ठलमन्दिरासाठी दान दिलेल्या दात्यांची नावं आहेत. त्यात देवगिरीच्या यादवराण्याचंही नाव आहे. असे थोरथोर लोक ज्या देवाचे भक्त, त्याची व्यवस्थाही तितकीच नेटकी. पांडुरंग एक्या गाभाऱ्यात उभा आहे. रखुमाबाईसाठी दुसरा गाभारा. बाहेर भला थोरला सभामंडप. ओवऱ्या. देवळाभवताली परकोट.

पहाटपासून देवाच्या पूजेचे उपचार सुरू. आधी काकडारती. मग मुख-प्रक्षाळण. देवाचं स्नान. अभिषेक, नैवेद्यप्रसाद. दिवसभर दर्शन करणाऱ्या भाविकांची गर्दी. संध्याकाळपासून भजन कीर्तन सुरू. असे तिन्ही प्रहर गज-बजलेले असायचे.

दामाशेटींना हरिभजनाचं वळण वाडवडिलांपासून मिळालेलं. पंढरपूर यात्रेचं गाव. बाहेरगावी हिंडावं लागायचं नाही. घरी बसल्याच पुरेसं शिवणा-टिपणाचं काम चालून यायचं. निष्ठेनं आपला उद्योग करावा अन् तो करता करता मुखी असावं देवाचं नाव. सकाळसंध्याकाळ रावळात दर्शनाला जावं.

पांडुरंगाचं श्रीमुख डोळेभरी पाहावं. असा काळ बरा चालला म्हणायचा. एकच सल होता. दिवसगत चालले, तरी गोणाईची कूस उजवली नव्हती. पोटी संतान नव्हतं.

## ३. गोणाईने नवस केला—

गोणाईनं विचार केला की, दीनांचा कैवारी केशीराज! जे मागायचं असेल, ते त्याला मागावं. उगीच याच्या त्याच्यापाशी तोंड वेंगाडून लाभ काय? म्हणून ती राउळात गेली. देवाच्या पाया पडली. अगदी मनापासून. त्याला म्हणाली,

'देवा एक मूल दे. कसं तरी हेंबाडं देऊ नकोस. ज्याच्या मनी तुझ्या विषयी प्रीत असेल, असं दे. हे केलंस, तर जन्मोजन्मी तुझी होऊन राहीन.'

जणू देवानं तिचं आइकलंच. लवकरच तिला दिवस गेले. मुद्रा उजळ दिसू लागली- आयाबाया कुजबुजू लागल्या, की दामाशेटीच्या घरी पाळणा हालणार आहे. आणि तो हालला.

दामाशेटीचं जूनसर, जेमतेम घर एका लहानग्याच्या बालक्रीडांनी गद-गदून गेलं. गोणाई लहानग्या नामदेवाला घेऊन पंढरीनाथाच्या राउळात गेली. तिथं तिनं त्याला देवाच्या पायांवर ठेवलं, म्हणाली,

'देवा, हे तुझं लेकरू, आता तूच याचा सांभाळ कर,'

ते लहानगं मूल पांडुरंगाकडे पाहून इवलंसं हसलं. जणू त्याला जन्मो-जन्मीची खूण पटली होती.

ते मूल प्रत्येक अवतारामध्ये देवाबरोबर होतं. जनाबाईचा एक अभंग आहे. ती म्हणते,

ऐका नामयाचा जन्म मूळसंचित ॥

'हिरण्यकशिपूचे कुळी नामा प्रल्हाद होता, तेव्हा मी पद्मिनी नामक

दासी होते. तेव्हा देवानं नृसिंहावतार धारण केला. रामअवतारामध्ये नामा अंगदरूपानं जन्मला. द्वापारयुगामध्ये कृष्णावताराचे वेळी तो उद्धव होता, तर मी होते कुब्जा दासी. आता कलियुगी हा नामदेव नाव घेऊन जन्मास आला, तर मी त्याची दासी जनी झाल्ये आहे !'

---

## ४. दासी जनी–

दामाशेटी एकदा देवाच्या दर्शनासाठी रावळात गेले. त्यांनी विठो डोळेभरी पाहिला. त्याच्या समचरणांवर मस्तक टेकलं. मग त्याला मनीचं गूज सांगून ते घराकडे परतू लागले. महाद्वाराबाहेर आले. पाहिलं, तर तिथं एका पायरीवर एक लहानगी मुलगी एकटीच बसली आहे. आईबापांवेगळी. ती वरल्या पायरीवर डोकं ठेवून विसावली आहे.

जणू ती देवाच्या पायाशी आली आहे, आता तिला कुण्या गोष्टीची काळजी उरली नाही. तिला एकटीला पाहून दामाशेटींना मोठं नवल वाटलं. ते तिच्यापाशी गेले. पुसू लागले,

'बाळा, तू कुणाची ?'

मुलीनं त्यांच्याकडे नुसतं पाहिलं. बोलली काहीच नाही. पुढला प्रश्न–

'तुझी आई कुठं ? बा कुठं ?'

तिनं उदासवाणं उत्तर दिलं,

'मला देवावेगळं कुणी नाही.'

'तू कुण्या गावची ?'

यावरही कसलंच उत्तर नाही. दामाशेटींचं मन कळवळलं, त्यांनी पुनः पुसलं,

'तू जेवलीस का, बाळा ?'

मुलीनं केवळ दामाशेटींकडे पाहिलं. तेवढ्या नुसत्या पाहाण्यानं त्यांना

खूप खूप कळलं. त्यांनी तिचा हात धरला. म्हणाले,

'चला बाळा, घरी चला.'

मुलगी उठली. दामाशेटींमागं चालू लागली. घरी पोचल्यावर दामाशेटी गोणाईला बोलले,

'ही देवानं दिलेली मूल. ही आपल्या घरी राहील.'

'अन् करील काय?'

'तुझ्या मुलाला सांभाळील. सांभाळशील ना, बाळा?'

नामदेव रांगत रांगत तिथपर्यंत आला होता. रडत होता. त्या मुलीनं पटकन् जाऊन त्याला उचललं. तो तिच्या कुशीत सुखावला. दोघांचं मैत्री जुळलं.

त्या मुलीला गोणाईनं पुसलं,

'बाये, तुझं नाव काय?'

मुलीनं नामदेवाला छातीशी धरीत म्हटलं,

'नाव? मला ठावकी नाही. लोक मला जनी म्हणतात.'

---

## ५. बाल्य—

घरची सगळीच देववेडी होती. घर पांडुरंगाच्या राउळासमोर. त्यामुळं ज्याच्या-त्याच्याबरोबर लहानग्या नाम्याला वारंवार राउळात जायला मिळायचं. अगदी पहाटपासून. पहाटे देवाचा काकडा व्हायचा. त्यानंतर भजन सुरू असायचं. तेव्हापासून नामा आपला राउळात. कधी आईच्या कुशीत बसलेला. कधी बापाच्या खांद्यावर. कधी जनीचं बोट धरून. रात्री जेवणं झाली, की एकीकडे त्याचे डोळे उठाबश्या काढू लागायचे. दुसरीकडे तो आई, जनी, बाप, कुणाच्या तरी मागं लागत म्हणायचा,

‘ देवलान च्यला ना ! ’

‘ कश्यासाठी गा नामया ? ’

‘ बाप्याचं भज्यन आइकायला ! ’

रावळात संत यायचे. साधू यायचे. हरिकीर्तन करायचे. चंद्रभागेच्या वाळवंटीही ती कीर्तनं रंगायची. नामा कुणाच्याही बरोबर कीर्तनाला जाऊन बसायचा. कीर्तनकारानं भजन करायला सांगितलं, की लहानगा नामा टाळ्या पिटीत म्हणायचा,

‘ पांदुलंग हाली जयजय पांदुलंग हाली ! ’

असं त्याचं लहानपण हरिरंगानं रंगून जाऊ लागलं. ज्या काळात इतर मुलं बेदुलांनी खेळून. अंग मातीनं भरवून घरी येतात, त्याच काळात नामयाचं हे असं झालं.

---

## ६. देव जेवला हो !—

नामा सात वर्षांचा झाला, अन् एक्या दिशी दामाशेटींना बाजारासाठी परगावी जायचं होतं. घोड्यावर कपड्यांची दिंडं लादीत ते गोणाईला म्हणाले,

‘ आइकलं का ? ’

‘ जी ! ’

‘ आज काई मला देवाला निवद दावायला जाता येणार नाही. पण घरचा निवेद रावळात गेला नाही, असं घडू देऊ नका. ’

‘ मग कुणासंगं धाडू ? जनीला धाडू का ? ’

‘ जनीला कशापाई ? नाम्याला धाडा की ! ’

नामा जनीसवे बाहेर लुडबुडत होता. त्याला हाक घालून गोणाईनं पुसलं,

‘ नाम्या, रावळात बाप्पाला निवेद घेऊन जाशील का ? ’

‘ मंजे बाबा बाप्पासाठी जेवण नतात तं ना ?’

‘ हो— ’

उडी मारून नामा म्हणाला,

‘ नीन की ! ’

लहानग्या नाम्यानं आंघोळ केली. कपाळावर गंधाच्या रेघा काढल्या. वर बुक्क्याचा टिळा. हट्टाहट्टानं धोतर नेसला. त्याच्या निऱ्यांचा घोळ पायात येत होता. असं सगळं बैजवार झाल्यावर आईनं वाढलेलं ताट हाती घेतलंन्. दुसऱ्या हाती पाण्याचं भांडं. जनीला हाक मारून तो म्हणाला,

‘ येती का जनाई, देवाला जेवण घेऊन जाऊ ! ’

जनीनं हासत म्हटलं,

‘ अरे नामया, त्याला जेवग म्हणत नाहीत. नैवेद्य म्हणतात. ’

‘ येती का ? ’

‘ जा रं बाळा तू येकटाच. माझं काम करायचं पडलंय बघ. ’

मग नामदेवाची स्वारी लुटूलुटू रस्ता ओलांडीत रावळात शिरली. सभामंडप ओलांडून तो गाभाऱ्यात पोचला. पाहिलंन् तर त्या दिवशी देवाजवळ कुणी नव्हतं. एकटाच देव कर कटावरी ठेवोनिया उभा होता. मुद्रा प्रसन्न होती. नामयाला वाटलं, तो आपल्याकडे पाहातोय. हसतोय.

नामा देवाला म्हणाला,

‘ पांडुरंग हारी, आज तुझं जेवग मी आणलंय बरं का ! ’

त्यानं ताट देवाच्या चौथऱ्यावर ठेवलं. मग दामाशेटी फिरवीत तसं भवताली पाणी फिरवलं. मग नाक दाबून धरलं. पुन: सोडलं. मग एक डोळा मिटला. दुसरा अर्धवट उघडा ठेवून तो हळूच देवाकडे बघू लागला.

देव आपला कर कटावरी ठेवोनिया उभाच !

नाम्याला वाटलं, देवाच्या मनात असं, हा आंघोळ करून आला नाही, म्हणूनच तो जेवत नाही.

दोन्ही डोळे उघडून नामया म्हणाला,

‘ अरे देवबाप्पा, मी आंघूळपांघूळ करून आलोय हां ! हे बघ छच्छ

धोतरही नेसून आलोय. वारकरी बुवा लावतात, तसं गंधही लावलं आहे. आता उशीर नको करू. जेवून टाक बघू ! '

तरी देव आपला गप्पच !

नामा काकुळत करून बोलला,

' जेव ना रे देवा ! अरे तू जेवल्याशिवाय माय काही मला वाढायची नाही. मला लागलंय खूप खूप भूक ! पोट कसं खाली गेलंय बघ. हां, चल आटप. मी नाक धरलं, डोळे सुद्धा मिटले – बाबा मिटतो तसे. हां हां, मघाशी एक डोळा उघडा ठेवला होता म्हणून ? अरे, आता बघ, दोन्ही डोळे गच्चम मिटतो.'

नामदेवानं दोन्ही डोळे घट्ट मिटले आणि पुन: उघडले तरी नैवेद्य जसाच्या तसा.

काय करावं ते नाम्याला कळेना. देवाला विनवून झालं. रावण्या झाल्या. भूक लागली हे सांगून झालं. शेवटी तो म्हणाला,

' अरे जेव ना रे बाप्पा ! तुला जेवू न घालता मी तसाच परतलो, तर आयशी मला मारील ना ! ' परिणाम काही नाही.

शेवटी नामा चिडला. ल्हानगा असूनही संतापला. म्हणाला,

' तू नाहीस जेवत ? ऐकत नाहीस ना ? ' ठीक आहे. नकोस जेवू. मी माझं डोकंच फोडून घेतो. हायजा ! एकदम दोन भकलंच करतो डोक्याची-नारळासारखी. '

तावातावानं नामदेव राउळाबाहेर पडला. तिथून एक धोंडा घेऊन तो परतला. तो देवासमोर ठेवला. शब्द काही बोलला नाही. खाली वाकला. अन् आता तो आपलं डोकं ताडदिशी त्या धोंड्यावर आपटणार, तो एक नवल घडलं.

आजपर्यंत असलं कधी झालं नव्हतं. सगळे भक्त येत. शहाणे, विद्वान येत. पंडित येत. भोळेभाळे येत. भाविक येत. धूर्त येत. देवाला नाना परींचा नैवेद्य दाखवीत. अगदी साध्या आमटीभाकरीपासून तो पंचपक्वान्नांपर्यंतचा.

ताटाखाली पाण्याचं स्वस्तिक काढावं. त्यावर ताट सारावं. मग त्यावरचं आच्छादन काढावं. प्राणायाम करावा. ब्रह्मार्पण म्हणावं. हात छातीशी धरावा.

नैवेद्य देवाला समर्पित करावा. डोळे मिटावेत. पुनः त्या भोवती पाणी फिरवावं. मग आच्छादन घालून ताट उचलावं अन् घरची वाट धरावी. सगळ्यांनी हे असंच केलं होतं. या सगळ्यांना माहीत होतं, की देव काही कटावरचे हात काढून अन् मांडी घालून जेवायला बसत नाही. त्यामुळं देवालाही सवय झाली असावी. पुढं नैवेद्य आला काय किंवा काट्यांचा ढिगारा आणून मांडला काय, दोन्ही सारखीच.

पण आजचं हे अधिक आगळंच होतं. देव जेवत नाही, हे लहानग्या भावड्या नाम्याला काय ठावकी ? तो आपला मनाशी घट्ट धरून बसला, की एवढं नाजूकसाजूक ताट वाढून ज्या अर्थी देवाकडे नेलं जातं, त्याअर्थी तो जेवत असलाच पाहिजे अन् आज ज्याअर्थी तो अजून जेवत नाही, त्याअर्थी आपलंच कुठंतरी काहीतरी चुकलं असलं पाहिजे.

बरं बुवा ! आमचं चुकलं, चुकायचंच. आम्ही अजून लहान आहोत. तर देवानं सांगावं, की बुवा असं नाही, असं करावं. ते काही नाही, अन् आपला नुसता हुम्म सुम्म उभा !

मग नाम्यानं चिडू नये तर काय करावं ? त्यानं ठरवलं, की ही थडी की ती थडी !

त्यानं मोठ्या ताकतीनं डोकं धोंड्याशी नेलं अन् आता तो ते आपटणार तो देव विटेवरून उतरला. त्यानं नामयाचा बाहुटा धरला. म्हणाला,

' थांब रे बाळा ! डोकं फोडून घेऊ नकोस.'

नाम्याला मोठं नवल वाटलं. आजपर्यंत त्यानं देव असंख्य वेळा पाहिला तर होताच. तो त्याला अतिशय आवडलाही होता. मात्र त्याचा स्वर नाम्यानं ऐकला नव्हता.

जणू शंभर घण्टा खूप दूर वाजत असाव्यात, तसं नाम्याला वाटलं. नव्हे, नव्हे, याहूनही खूप वेगळं. चमत्कारून तो वर पाहू लागला.

खरोखरी देव विटेवरून खाली उतरला होता. त्यानं नाम्याचा बाहुटा हाती धरला होता. नाम्याला फार फार मजा वाटत होती. देव पुन्हा म्हणाला,

' ऐकलंस का नाम्या, डोकं फोडून घेऊ नकोस.'



नाम्या सावरला. तो म्हणाला,

'मग तू जेवत का नाहीस ?'

'जेवतो.'

'हां, अगदी निपटी शिपटी जेवून टाक. काही सुद्धा उरू देऊ नकोस. आईनं तसं काही फार वाढलं नाहीए तुझं ताट. मी असं करू का ?'

'कसं करतोस ?'

'धावत घरी जाऊन आणखी आणू का ?'

'नको नको ! एवढं मला पुरे.'

देव जेवला. खरोखरी जेवला. त्यानं सगळं चाटून पुसून खाऊन टाकलंन् ! नाम्या हरखून म्हणाला,

'हां आता कसं झालं बरं ! मग जाऊ का आता मी ?'

'जा !'

'दुपारच्यानं तुला पुनः भूक लागली, तर मला सांग बरं का ! दुपारी मी येईन—'

'अरे नको येऊस. तसा ये, पण आता मला भूक नाही लागायची.'

फुशारलेला नाम्या देवाचं उष्टं ताट उचलून ते हातीच्या भांड्यानं वाजवीत धावत धावत घरी आला. आईपुढं दोन्ही भांडी ठेवून तो म्हणाला,

'आये, तू आज देवाला अगदी थोडं वाढलं होतंस.'

गोणाई नवलानं नाम्याकडे पाहू लागली. तो पुढं बोलला,

'त्याचं पोट भरलं नसेल.'

गोणाईनं पुसलं,

'नाम्या, निवद काय झाला रे यातला ?'

'देवानं खाल्ला !'

'मेल्या, देवानं खाल्ला होय रे ? देव कुठं निवद खात असतो का ?'

'अग खरोखरी खाल्ला.'

'काय इप्रीत कार्ट आहे ! म्हणे देवानं निवद खाल्ला, यानंच खाल्ला असेल अन् देवावर नाव घालतंय.'

'अग खरोखरी खाल्ला त्यानं. चल वाढ मला. लई भूक लागली.'

नाम्या अगदी गळ्यावर हात ठेवून म्हणे, की देवानं नैवेद्य खाल्ला. गोणाई विचार करी, की इतकी युगं झाली, विठोराणा रावळात उभा आहे. पण त्यानं नैवेद्य खाल्ल्याचं काही आपण कधी आइकलं नाही. बरं, खोटं म्हणावं, तर हे पोरटं अगदी आणाशपथा करतंय्.

संध्याकाळी दामाशेटी घरी आले. आल्याबरोबर गोणाईनं म्हटलं,

'आइकलं का पोराचं इप्रीत ?'

धसकून त्यांनी पुसलं,

'काय झालं ?'

'व्हायचंय् काय ? निवद घेऊन रावळात ग्येलं, आन् म्हनं तो देवानं खाल्ला !'

आतापर्यंत कधी नामदेव खोटं बोलल्ला दामाशेटींना माहीत नव्हता. ते म्हणाले,

'न्हाई ग ! पोरगं लबाड बोललं न्हाई कधी.'

'आता तुमीच विच्यारा म्हंजी झालं.'

दामाशेटींनी नामदेवाला हाक मारली. ती आइकता बरूबर तो धावतच आला, अन् बापाच्या गळ्यात पडून म्हणू लागला,

'बाबा, म्हाईत हाये का ? देवाला रोज तुम्ही जेवू घालता का नाही ?'

'मग ?'

'आज किनी तो जेवतच नव्हता.'

'पुढं काय झालं ?'

'मग मीही कातावलो. बाहेरून येक धोंडा आन्ला. त्याच्यावर डोस्कं फोडू लागलो, तेव्हा मुकाट्यानं खाली उतरला आन् सगळं ताट लख्ख केलं.'

थोडा विचार करून दामाशेटी म्हणाले,

'तेव्हा कुणी होतं का रावळात ?'

'ऊं हूं ! मोकळं चाकळं होतं राऊळ.'

क्षणभरानं दामाशेटींनी विचारलं,

'उद्या जेवायला घालशील का देवाला ?'

'हा बी!'

दुसरे दिवशी पुनः लहानगा नामा कालच्यासारखाच नैवेद्य घेऊन रावळात गेला. जाऊन देवाला म्हणाला,

'हां देवा, पट्टदिशी जेवून घ्या बघू! मला उशीर होतोय्.'

आणि देव खाली उतरला! जेवू लागला.

बाहेरून हे बोलणं दामाशेटींनी चोरून आइकलं. नवलानं त्यांचं मन भरून गेलं.

---

## ७. नामयाचं लगीन—

गोविंदशेट सदावर्ते कापड–खरेदीसाठी पंढरपुरी आले. दामाशेटींची त्यांची ओळख. घरी आले. दोघे मिळून रावळात गेले. देवाचं दर्शन झालं. प्रदक्षिणा झाली. मग दोघेही रावळाच्या कट्ट्यावर बसले. घरच्या चौकश्या झाल्या. कुशल पुसून झालं. गोविंदशेटनी विचारलं,

'नामदेव कुठं दिसत नाही?'

'तो इथंच कुठं तरी रावळात असेल. जातोय् कुठं?'

'केवढा झाला तो आता?'

'आता आठवं सरून नववं लागणार की!'

'अरे वा! मग आता बार उडवून टाकला पाहिजे!'

'कसला बार उडवताय राव?'

'का हो? पोराचं लगीन करायला नको? वेळच्या वेळीच हे सगळं उरकलं की बरं आसतं.'

'अहो, पोराचं लक्षच नाही परपंचात.'

चपापून गोविंदशेटनी विचारलं,

'म्हंजे काय वाईटवकटं?'

‘ छा: ! पण रातंदीस देवदेव करीत बसायचं म्हंजे काय ? एवढं मोठं पोरगं झालं, काई त्यानं उद्येगधंद्याकडे बघायला नको ?’

‘ काय हो, म्हणे नामयाच्या हातचं देव जेवला !’

दामाशेटी क्षणभर थांबले. मग त्या दिवशीचा प्रकार सांगून पुढं ते म्हणाले,

‘ जणू येखादा मित्रसखा बोलत असावा ना, तसं पोर देवाशी बोलत होतं. हळू जेव काय ! सावकास काय ! ठसका लागेल काय !’

अचंब्यानं गोविंदशेट म्हणाले,

‘ तुमी सवता आइकलं का हे सगळं ?’

‘ तर ! हितं गाभाऱ्याबाहेर उभा होतो नी ! परत्यक्षे माणूस जेवत असावं आन् शेजारी बसलेलं त्याच्याशी गप्पा हाणीत असावं, त्यातली गंमत !’

‘ तुमी बघितलं का काई ?’

‘ जेवताना नाई बघितलं देवाला. पण बाहेर आल्यावर म्या पाहिलं, की ताट लख्ख मोकळं आहे !’

गोविंदशेटनं दामाशेटीचा हात धरला. बोलले,

‘ सोयरे, ऐका माझं.’

‘ बोला.’

‘ नामदेवाला मी जावई करून घेतो—’

‘ आहो पण परपंचाकडे—’

‘ आहो, गळ्यात पडला ना परपंच, का माणूस चट शाहाणा होतो.’

‘ काई काम धंदा—’

‘ माझी पोर राजाई शाहाणी आहे. तुम्ही पघितली तिला. काई खोड काढायला जागा ?’

‘ नाई खरं—’

‘ मग ती लावील सगळं नीट लागी. तुम्ही हो म्हणा—’

‘ पर इतक्या घाईनं कसं ? घरचा काई विच्यार—’

ना... २

'हा बी !'

दुसरे दिवशी पुनः लहानगा नामा कालच्यासारखाच नैवेद्य घेऊन रावळात गेला. जाऊन देवाला म्हणाला,

'हां देवा, पट्टदिशी जेवून घ्या बघू ! मला उशीर होतोय्.'

आणि देव खाली उतरला ! जेवू लागला.

बाहेरून हे बोलणं दामाशेटींनी चोरून आइकलं. नवलानं त्यांचं मन भरून गेलं.

## ७. नामयाचं लगीन—

गोविंदशेट सदावर्ते कापड–खरेदीसाठी पंढरपुरी आले. दामाशेटींची त्यांची ओळख. घरी आले. दोघे मिळून रावळात गेले. देवाचं दर्शन झालं. प्रदक्षिणा झाली. मग दोघेही रावळाच्या कट्ट्यावर बसले. घरच्या चौकश्या झाल्या. कुशल पुसून झालं. गोविंदशेटनी विचारलं,

'नामदेव कुठं दिसत नाही ?'

'तो इथंच कुठं तरी रावळात असेल. जातोय् कुठं ?'

'केवढा झाला तो आता ?'

'आता आठवं सरून नववं लागणार की !'

'अरे वा ! मग आता बार उडवून टाकला पाहिजे !'

'कसला बार उडवताय राव ?'

'का हो ? पोराचं लगीन करायला नको ? वेळच्या वेळीच हे सगळं उरकलं की बरं आसतं.'

'अहो, पोराचं लक्षच नाही परपंचात.'

चपापून गोविंदशेटनी विचारलं,

'म्हंजे काय वाईटवकट ?'

‘ छा: ! पण रातंदीस देवदेव करीत वसायचं म्हंजे काय ? एवढं मोठं पोरगं झालं, काई त्यानं उद्येगधंद्याकडे बघायला नको ? ’

‘ काय हो, म्हणे नामयाच्या हातचं देव जेवला ! ’

दामाशेटी क्षणभर थांबले. मग त्या दिवशीचा प्रकार सांगून पुढं ते म्हणाले,

‘ जणू येखादा मित्रसखा बोलत असावा ना, तसं पोर देवाशी बोलत होतं. हळू जेव काय ! सावकास काय ! ठसका लागेल काय ! ’

अचंब्यानं गोविंदशेट म्हणाले,

‘ तुमी सवता आइकलं का हे सगळं ? ’

‘ तर ! हितं गाभाऱ्याबाहेर उभा होतो नी ! परत्यक्षे माणूस जेवत असावं आन् शेजारी बसलेलं त्याच्याशी गप्पा हाणीत असावं, त्यातली गंमत ! ’

‘ तुमी बघितलं का काई ? ’

‘ जेवताना नाई बघितलं देवाला. पण बाहेर आल्यावर म्या पाहिलं, की ताट लख्ख मोकळं आहे ! ’

गोविंदशेटनं दामाशेटीचा हात धरला. बोलले,

‘ सोयरे, ऐका माझं. ’

‘ बोला. ’

‘ नामदेवाला मी जावई करून घेतो—’

‘ आहो पण परपंचाकडे—’

‘ आहो, गळ्यात पडला ना परपंच, का माणूस चट शाहाणा होतो. ’

‘ काई काम धंदा—’

‘ माझी पोर राजाई शाहाणी आहे. तुम्ही पघितली तिला. काई खोड काढायला जागा ? ’

‘ नाई खरं–’

‘ मग ती लावील सगळं नीट लागी. तुम्ही हो म्हणा–’

‘ पर इतक्या घाईनं कसं ? घरचा काई विच्यार–’

ना... २

'ते मी करतो समदं... रावळात देवासमोर बसलो आहोत. निसतं हो म्हणा म्हंजे झालं.'

थोडे आढेवेढे घेऊन शेवटी दामाशेटींनी हो म्हटलं.

मग मोठ्या उत्साहानं गोविंदशेटनं सगळा बेत जमवून आणला. एक छानदार मुहूर्त शोधला. पाहुणेरावळे जमले. आवतणं केली. पहिलं आमंत्रण देवाला.

ऐन लग्न लागलं, त्याही दिवशी नामदेवाला देवळातून शोधून आणावं लागलं. अक्षता डोक्यावर पडल्या अन् पुनः बाशिंगासुद्धा नामदेव आपला रावळात पळाला.

## ८. देववेडा—

लग्न होऊनही नामा होता तसाच देववेडा ! त्याच्यात कसलाच फरक झाला नाही. बाळपणीची पोराटकी मागं पडली. आता त्याला अधिक कळू लागलं.

देवाचं रूप कळू लागलं. त्याचे कमळासारखे डोळे, विशाल कपाळ, साजिरं नाक. मस्तकावरला मुकुट. कानांतली कुंडलं. नेसूचा पीतांबर. गळ्यातली तुळशीमाळ. छातीवरलं पदक. त्याची हास्यमुद्रा. भाळीचा कस्तुरीचा टिळा. हे सगळं देखणं वाटू लागलं. तिथं दृष्टी खिळू लागली. रात्रंदिवस ते पाहात राहावंसं वाटू लागलं.

देवाच्या दर्शनाला साधुसन्त येत. भाविकभोळे येत. काही स्वार्थी लबाडही येत. या लबाडांचा नाम्याला राग येऊ लागला. साधुसन्त म्हणत,

— हा विठ्ठल पहा ! अठ्ठावीस युगांपासून आपल्या भक्तांची वाट पाहात उभा आहे. कर कटावरी ठेवोनिया. योगी याचं ध्यानं करतात. त्यांना तो दिसत नाही. तपस्वी याच्यासाठी तप करतात. पण तपानं तो गवसत नाही.

साधक याच्यासाठी साधनं करतात. साधनांनी तो सापडत नाही. असा हा पांडुरंग पुंडलीकासाठी युगा अठ्ठाविसांपासून इथं थांबला आहे.

हे नामदेव आइके अन् त्याला नवल वाटे.

ध्यानानं हा दिसत का नाही? तपानं हा गवसत कसा नाही? साधनांनी तो सापडत काय म्हणून नाही?

मला तर तो दिसतो. माझ्याशी बोलतो. मी आग्रह केला, की जेवतो.

असा थोडथोडा अहंकार नामयाच्या मनी साठू लागला.

---

## ९. विठ्ठलरंगी रंगला—

नामदेवाचं लग्न लहानपणी झालं, असं नव्हे. त्या काळात हे असंच होत असे. मुलगी पाच वर्षांची झाली, की लग्न करून टाका. मुलगा सात आठ वर्षांचा झाला की, मुंडावळ्या बांधून लग्नाला उभा करा. इतर मुलांची लग्नंही अशीच लहानपणी होत. सताठदहा वर्षांचा मुलगा झाला, की बापाला उद्योगधंद्यात मदत करू लागे.

दामाशेटींना वाटलं होतं, की लगीन झाल्यावर तरी नामा शहाण्यासुरत्यासारखा वागू लागेल. हाती कातरी गज घेईल. गजानं कापड मापील. कातरीनं ते फाडील. सुईत दोरा ओवून कपडे शिवायला बसेल. कुडती, बंड्या बाराबंद्या, चोळ्या, असा तयार कपड्यांचा ढीग घालायला आपल्याला मदत करील. मग आपण दोघे त्या कपड्यांच्या घड्या घालू. एकावर एक रचू. गठ्ठा बांधू. काही इथल्या बाजारात विकू. काही घोड्यावर घालून गावोगाव हिंडू. तिथं बाजारहाट भरतात. त्यात बसू. गिऱ्हाईकांशी भावराव करू. बख्खळ पैका कमवू.

मग एखादी म्हैस घेऊ. घरी गाय आहे खरी, पण तिचं दूध पुरत नाही. म्हैस आल्यावर दुधातुपाची चंगळ होईल. इतकी माणसं घरी आपण सगळी.

कामासी दासी जनी. या सगळ्यांची दुधातुपाविना आबाळ होते. म्हैस आल्यावर पोटभर दूधतूप खातील. तुकतुकीत होतील. नाम्याची बाइकू सुखावेल. बापाच्या घरी जाऊन सांगेल, की सासरी सगळं भरपूर आहे बरं का ! कुण्या गोष्टीची कमी नाही.

पण क़सचं काय नि फाटक्यात पाय !

नामदेवाचं लक्ष काही प्रपंचाकडे लागेना !

---

## १०. ऐसा कैसा कुलक्षण—

शेवटी गोणाई कावली. एक्या दिशी ती उठली, अन् नाम्याला शोधायला राउळाकडं गेली.

**तेथून लवलाहे धांवत निघाली ॥**
**महाद्वारा आली पहावया ॥**

महाद्वारापाशी येऊन पाहात्ये, तो संतांच्या दाटीत तिला तिथं नामा दिसला. कसा ? तर एखादं चित्र काढलेलं असावं. एखादा पुतळा असावा. हालत नाही की डोलत नाही. दृष्टी सारखी पांडुरंगाच्या मुखकमळाकडे लागलेली.

**तो तंव पांडुरंगा संमुख देखिला**
**चित्रींचा लिहिला पुतळा जैसा ॥**
**नाहीं चळणवळण तटस्थ नयन**
**केलें लिंबलोण योगीजनीं ॥**

गोणाईनं हाका मारल्या,

‘ नाम्या रे ! अरे नामदेवा ! अरे माझ्या पुता ! ’

पण ढिम्म नाही. नामदेवाचं लक्ष देवाकडे. शेवटी ती चिडली. धावत

त्याच्यापाशी गेली. त्याचा हात धरून तिनं ओढला. नामदेव धाडदिशी भुई कोसळला.

**ते देखोनि मातेसी थोर द्वेष आला**
**क्रोधे आसुडिला करीं धरूनी ॥**
**तंव प्रेताचिये परी पडिला भूमीवरी ॥**

शुद्धीवर येऊन नामदेव इकडे तिकडे पाहू लागला, तो हात आईनं धरलेला. ती संतापलेली. नामदेव म्हणू लागला,

' अगे आई ! तू असं का केलंस ? मी पांडुरंगाचं रूप हृदयाशी धरलं होतं. त्याच्याशी एकरूप झालो होतो. तो तू मधे असा अंतराय का केलास ? तू हत्याराविना जणू मला जिवे मारलंस. आता मी माझ्या मनीची तळमळ कुणाला सांगू ? ती कोण आइकेल ? मी आता घरी येणार नाही. तू माझी वाट पाहू नकोस. मी देवाचा झालो. तू मला त्याच्याकडे सोपवून दे. तू इथून जा !

**शस्त्रेंवीण वध केला अवचिता**
**जीव तळमळता जाऊं पाहे ॥**
**आतां परतोनी माझी वाट पाहासी**
**साच रिपु होसी तरी जाण ॥**
**नामा म्हणे माते जाईं वो येथुनी**
**मज जाईं निरवुनी विठोबासी ॥**

गोणाई कपाळ पिटीत म्हणू लागली,

' कसं ग बाई लेकरू जन्मलं माझ्या पोटी ! नाही तर लोकांची लेकरं पाहा, कसा छान घरसंसार करतात. रात्रंदिवस प्रपंचात असतात. इकडे तिकडे ढुंकत सुद्धा नाहीत. देव नको नि धर्म नको. हेच कार्ट असं कसं निघालं ! कात्री, सुई, दोरा अंगुस्तान, ही आपापली हत्यारं सांभाळावी. टराटरा कापडं फाडावी. शिवावी. उद्योधंदा पाहावा. ते दिलं टाकून अन् देवळशी झालं. '

**सुदैवाचीं लेकुरें वर्तताती कैसी**
**तूं एक झालासी कुळक्षय ॥**
**शिवण्या टिपण्या घातिलें पाणी**
**न पाहासी परतोनी घराकडे ॥**

नामदेवानं निक्षून सांगितलं,

'तू काय वाटेल ते सांगितलंस, तरी हा माझ्या जीवीचा जीव सुटायचा नाही. हाती टाळवीणा. मुखी त्याचं नामस्मरण. यानंच माझ्या मनाला फार फार सुख होतं. ही अगदी शेवटची गोष्ट. यापरतं काहीही नाही.'

**टाळ दिंडी घेऊनी नाचतो रंगणीं**
**तेणें माझ्या मनीं सुख वाटें ॥**

## ११. मेहुण्यांना पाहुणचार—

एक्या दिवशी काय झालं की, गोविंदशेट सदावर्त्यांनी दोघा मुलांना सांगितलं, राजाईला भेटून फार दिवस झाले. एकदा तुम्ही दोघे पंढरीस जा. पांडुरंगाचं दर्शन घ्या. नामदेवाचं घर तिथंच रावळासमोर आहे. तिथं जाऊन वहिणीस भेटा. तिचं कुशल विचारा. नामदेव तिच्याशी कसा काय वागतो, ते समक्ष पाहा. रातची रात राहा. अन् मग सावकाश घरी परता. घरून जेवून निघा म्हणजे झालं. म्हणजे तिथं जेवायला उशीर झाला तरी काही काळजी नाही.

दोघे जण निघाले. पंढरीस आले. पांडुरंगाचं दर्शन घेऊन नामदेवाच्या घरी पोचले. राजाईनं त्या दोघांना पाहिलं, तशी फार फार सुखावली. हातचं काम टाकून दिलं. बंधूराजांना कडकडून भेटली. बसायला घोंगडी टाकली. गूळपाणी दिलं. माहेरीचं अवघं पुसून झालं. आई कशी. बाबा कसे.

भावांनी हळूच विचारलं,

'नामदेवराव कुठं दिसत नाहीत ?'

राजाईनं कपाळावर हात मारून घेतला. भावांनी का म्हणून पुसता राजाई म्हणाली,

'ते लागलं काळ्याच्या नादी !'

अचंब्यानं भावांनी पुसलं,

'काळ्या कोण काढला आता ? मागं पांडुरंगाची— '

'अरे बाबा तोच तो ! त्यानंच केलं माझ्या संसाराचं वाटोळं ! संसाराकडे का घ्यान आहे त्यांचं ? खुशाल रावळात विठ्ठल विठ्ठल म्हणत नाचतात. धुंद होऊन. का लौकिकाची चाड आहे ? का आबरूचं भय आहे त्यांना ! '

**नामदेवाघरीं पाहुणे मेहुणे**
**आले दोघे जणे पंढरीसी ॥**
**राजाईनें बंधु देखुनी दृष्टीसी**
**उल्हास मानसीं थोर झाला ॥**
**कडकडुनी भेटी लोभाची आवडी**
**टाकली घोंगडी बैसावया ॥**
**भ्रतार लागले विठोबाच्या ध्यानीं**
**संसाराची मनीं आस्था नाहीं ॥**
**नाचतो निर्लज्ज होऊन निःशंक**
**सांडिला लौकिक देहभाव ॥**

असं राजाई बोलती आहे, तोवर नामदेव घरी परतला. राजाई घाईघाईनं उठून आत गेली. दोघे मेहुणेही उठून उभे राहिले. पण हरिरंगी रंगलेल्या नामदेवाचं त्यांच्याकडे लक्षच नव्हतं मुळी. राजाई आतून हे सगळं बघत होती. ती अशी भडकली ! बाहेर आली अन् नामदेवाला तडातडा बोलू लागली. म्हणाली,

'बघितलंत बाबांनो ! असा आनंद आहे आमच्या घरी ! असा चालला आहे आमचा परपंच. आता माझे कवतिकाचे बंदूराज आले. त्यांच्याशी क्षणभर बोलायचं, या बसा म्हणायचं, घरच्यांची चौकशी करायची. ते राहिलं कुणीकडे हे ओळख तरी दाखवताहेत का ? संताळे अगडधूत येऊ द्या, की हाती टाळवीणा नाचवीत, मग पाहा कसे मिठ्या मारतात त्यांना ! फुटलंऽग बाई माझं कपाळ ! '

**ऐसें जव सांगे राजाई बंधूसी ।**
**तव आले घरासी नामदेव ॥**
**तयासी सोईरे अभ्युत्थान देती ।**

न भेटे तयासी विष्णुदास ॥
देखुनी कांतेसी क्रोध आला फार ।
असोनी संसार नाहीं आम्हा ॥
अगडधूत येती घेउनी टाळवीणा ।
लागे त्यांच्या चरणां वेळोवेळां ॥
माझे सख्खे बंधू घरा आले बाई ।
रामराम तोही न घे त्यांचा ॥

नामदेवाची समाधी आता कुठं उतरली. त्यानं मेहुण्यांची विचारपूस केली. अन् तो आत जाऊन राजाईला म्हणाला,

'पाणीबिणी दिलंस का नाही ?'

राजाई तणतणली,

'पाणीबिणी कसलं विचारताय ? घरात अन्नाचा दाणा नाही. रात्री माझे भाऊ जेवायचे आहेत. काही धान्य घेऊन या. गहू, गूळ, तूप—'

'असं म्हणत्येस ?'

'तर मग कसं म्हणू ? सकाळी घरून जेवून निघालेले. त्यावर ही एवढी चाल झालेली—'

राजाई ते पुसे अहो नामयाला ।
करा जेवायला कांहीं यांसी ॥
प्रातःकाळि घरीं सारुन भोजन ।
आले ते चालून माझे भेटी ॥

टाळी वाजवून नामदेव म्हणाला,

'वा वा ! मोठ्या छान मुहूर्तावर आले बघ !'

'कसला छान मुहूर्त ?'

'असं बघ, आज आहे दशमी. आज एकभुक्त राहायचं असतं. एकदाच जेवायचं असतं. ते तर त्यांचं जेवण घरी उरकलंच आहे—'

राजाईनं कपाळावर हात मारला. नामदेव म्हणाला,

'झालं ? उद्या एकादशी. दिवसभराचा उपास करायचा—'

'आणि ?'

'आणि काय? दिवसभर रावळात नामस्मरण होईल, ते आइकावं. रात्री कीर्तनाला बसावं. आणि मग परवा मध्यान्हीस द्वादशी सोडावी अन् घरी परतावं.'

**नामा म्हणे कांते दशमी एकभुक्ती**
**भोजन निश्चिती करू नये ॥**
**उदईक हरिदिनी उपवास जागरण**
**ऐकावें कीर्तन चार प्रहर ॥**
**द्वादशी पारणें झालिया भोजन ॥**

पाहुण्यांनी ऐकलं हे अन् धास्तीच घेतली. रात्रभर राहिले बहिणीकडे, पण वैऱ्यासारखी रात्र संपता संपेना झाली.

**ऐकोनि पाहुणे चिंतातुर ॥**
**क्षुधातुर पोटीं निद्रा न लगे कांहीं**
**वर्षाएवढी पाहीं रात्र झाली ॥**

असा नामदेवाचा प्रपंच. दृष्ट लागण्यासारखा.

---

## १२. देवपूजा–

श्रीहरीची मूर्ती अशी नामदेवाच्या मनी ठसली. रात्रंदिवस त्याला दुसरं काही सुचेना झालं. सारखा रावळात पडलेला. पहाटेपासून रात्र होईपर्यंत.

भक्तमंडळी देवाला पहाटेस म्हणायची, देवा, आता उठा. जागे व्हा. भजनं म्हणत देवाला जागं करायला धडपडायची.

देव रात्रंदिवस जागाच. तो कधी झोपत नाही. तो झोपला, तर चहू दिशांना केवळ अंधार होईल. सगळं जग त्या काळोखात बुडून जाईल.

देवाला स्नान घालावं लागत नाही. तो कधी पारोसा होत नाही. त्याच्या मस्तकावर चन्दनाची उटी माखावी लागत नाही. त्याला वस्त्रं नेसवावी

लागत नाहीत. तो पावसाच्या धारांखाली नाहात असतो. मेघांची उटी लावीत असतो. आकाशाचं वस्त्र नेसून असतो.

त्याला नैवेद्यही दाखवावा लागत नाही. आपण नैवेद्य दाखवला, तरच तो जेवला, एरवी तो उपाशी राहिला, असंही कधी होत नाही. अवघ्या जीवांच्या मुखानं तो जेवतो.

पण भक्ताचं त्यानं भागत नाही. त्यांनी कल्पना केली, की देवळात कटावरी कर ठेवून उभा आहे, तोच तेवढा देव. मग रात्री त्याला झोपवायचं. पहाटे काकडआरती करीत उठवायचा. मग स्नान घालायचं. पीतांबर नेसवायचा. नैवेद्य दावायचा.

देवाचं कुठलंही नाव नाही. भक्तांनी त्याला नाव ठेवलं. देव काहीच करीत नाही. हे म्हणतात, की त्यानं हे केलं, ते केलं. देव झोपेनिजेवेगळा. हे सांगतात, की आता देवाला झोप लागली. थोड्या वेळानं तो उठेल. देवाला आकारच नाही. पण हे बोलणार, की देव एवढा हो ! देव तेवढा हो ! देवाला तर काहीच लागत नाही. हे देवासाठी चंदन, फुलं, तुळशी, असं गोळा करीत हिंडणार. देव ना गोरा ना काळा. पण हे देवाचं रंगरूप वाखाणणार.

देवाचं आवाहन करणार. शेवटी त्याच्या मूर्तीचं विसर्जन करणार. मग त्याच्यासाठी आसवं गाळणार !

तो तर आकाशाचं वस्त्र ल्याला आहे. पण हे त्याला नेसायला पीतांबर आणणार. त्याच्यासाठी दागदागिने करणार. आता देवाची प्रकृती कधी बिघडते का ? पण हे त्याची नाडी पाहाणार. त्याला खोकला पडसं झालं, असं समजून हे त्याच्यासाठी औषध आणणार. देव अवघ्या जाती वेगळा. पण हे तो ब्राह्मण की क्षत्रिय, असं भांडत बसणार.

नामदेवही देवाला असंच लोटक्यात घालून सांभाळीत होता. देवाचं व्यापकपण त्याच्या ध्यानीच येत नव्हतं. विटेवर उभी असलेली पांडुरंगाची मूर्ती, हेच त्याचं सगळं काही होतं. त्याबाहेर लक्ष जातच नव्हतं त्याचं. त्याचं वय वाढत चाललं, समजूत होती तिथंच राहिली.

## १३. परीक्षा—

पंढरीची कार्तिकी वारी. चन्द्रभागेचं वाळवंट टाळ मृदुंगांच्या नादानं कोंदून गेलं होतं. चहूं दिशांचे वारकरी सन्त महन्त पंढरिनाथाचं दर्शन घेत होते. गरुडपारी हरिहरी म्हणत नाचत होते. महाद्वारी लोटांगण घालीत होते. वाळवंटी हरिगजरामध्ये तल्लीन होत होते. असा एकच कल्लोळ उसळला होता.

यंदा तर त्या सोहोळ्याला सुगंध लाभला होता. भक्तांचे मुकुटमणी ज्ञानोबा पंढरीला आले होते. सवे होते श्रीगुरू निवृत्तिनाथ. धाकुला सोपान. चिमुरडी चिमखडी मुक्ताई. त्यांच्या भोताली कितीक साधूसन्त गोळा झाले होते. विसोबा खेचर होते. गोरोबा कुंभार होते. हे दोघेही वयानं वडील. डोक्यावर पांढर वसली होती. पण ज्ञानोबांचा अधिकार फार मोठा. त्यांच्यापुढं हे नम्र झाले होते.

या मंडळींनी आइकलं होतं, की पंढरीत नामदेव फार मोठा माणूस. प्रत्यक्ष देव त्याच्याशी बोलतो. त्याच्या सांगीप्रमाणं जेवतो. तेव्हा एकदा नामदेवाला भेटावं, असं या मंडळीच्या मनी फार होतं.

नामदेवानंही आइकलं, की मोठमोठे संत वाळवंटात गोळा झाले आहेत. असे आहेत तरी किती मोठे? एकदा बघावे तरी, असं योजून नामदेव वाळवंटी आला.

नामदेवाला पाहाताच एका वारकऱ्यानं धावत जाऊन संतमंडळीला सांगितलं,

'नामदेवमहाराज आले बरं का!'

तक्षणी निवृत्तिनाथ उठून नामदेवांकडे चालले. त्यांच्या मनी असं, की ज्याच्याशी देव बोलतो, त्याला नमस्कार केला पाहिजे. त्याच्या पायांवर डोकं ठेवलं पाहिजे.

नामदेव खुंटासारखा उभा राहिला. निवृत्तिनाथांनी त्याच्या पायी मस्तक टेकवलं. नामदेव काही तिळभरही वाकला नाही. त्याच्या मनी असं, की मी

रात्रंदिवस देवाजवळ असतो. देव माझ्याशी गप्पागोष्टी करतो. मी सांगितलं की बसतो, माझ्या म्हणण्याप्रमाणं उठतो देखील. तेव्हा माझ्या पाया पडले हे सन्त-महन्त, हे वरोबरच झालं. त्यांनी मला नमस्कार केलाच पाहिजे. मला मात्र त्यांना नमस्कार करायची गरज नाही !

निवृत्तिनाथांच्या पाठोपाठ उठले ज्ञानोबा. त्यांनी म्हटलं, की साक्षात्कारी पुरुष आहे. त्याच्या चरणी मस्तक ठेवलं पाहिजे.

ज्ञानोबा म्हणजे ब्रह्मसाम्राज्याचा सम्राट. योगियांचा शिरोमणी. साधकांचा मायबाप. कैवल्याचा पुतळा. प्रत्यक्ष तो नामदेवाच्या पाया पडला. तरी नामदेवाच्या मनी असा अहंकार दाटला की पुसू नये.

तो मनी म्हणाला–

–मग ? असे ना का चैतन्याचा जिव्हाळा. वयानं तर माझ्यापेक्षा लहान आहे की नाही ? पडला पाया म्हणून काय झालं ?

ज्ञानोबा चरणी मस्तक ठेवून मागं सरले, नामदेव आपला मल्लखांबासारखा ताठ. वाकला नाही की झुकला नाही.

ज्ञानदेवांच्या पाठोपाठ सोपानानं नामदेवाच्या चरणी दण्डवत घातला. जो निवृत्ति– ज्ञानोबासमोर वाकला नाही, तो सोपानासमोर काय वाकणार !

हे सगळं मुक्ताईनं पाहिलं आणि ती मात्र चिडली. निवृत्तिनाथांना म्हणाली,

‘ निवृत्तिदादा, असं काय हे ? ’

‘ काय झालं, बाळा ? ’

‘ नुस्ता नर्मदेतला दगड ! ’

‘ कुणाविषयी बोलत्येस ? नामदेवाविषयी ? ’

‘ होय होय ! इतकी वर्षं हा देवाजवळ राहिला, आणि याचा अहंकार अजून गेला नाही ? ’

‘ असं बोलू नये, मुक्ते ! ’

‘ मग कसं बोलावं ? कल्पतरूखाली हा नांदतो आहे, आणि हाती पाहावं तर नरोटी ! घरी याच्या कामधेनू आणि हा दारोदार हिंडतो आहे. कशासाठी ? तर ताकासाठी ! ’



‘तसं नव्हे, मुक्ताई. यानं भक्तीच्या बळावर प्रत्यक्ष देवाला अंकित करून घेतलं. याचा महिमा कोण वर्णू शकेल? याची पायधूळ मस्तकी लावल्यानं आपल्या वंशाचा उद्धार होतो ग बाई!’

‘काही सांगू नका, दादा! ज्या भक्तीमुळं सगळ्या विश्वात भरलेला परमात्मा ओळखू येत नाही, ती भक्ती काय कामाची?’

म्हातारे गोरोबा कुंभार जवळच बसले होते. त्यांनी हसून मान डोलावली. एकदम मुक्ताई त्यांच्याकडे वळून म्हणाली,

‘गोरोबाकाका, तुमचं थापटणं—मडकी ठोकायचं—ते आहे का जवळ?’

‘मिळेल इथं कुठं.’

‘मग एकदा मडक्यांची परीक्षा करा ना? भाजली कुठली – कच्ची कुठली—’

गोरोबांना खूण कळली. थापटणं पैदा करून ते त्या मेळाव्यात उभे राहिले. निवृत्तिनाथांपाशी जाऊन ते म्हणाले,

‘काय मडकं भाजलं की कच्चं?’

हसत निवृत्तिनाथ म्हणाले,

‘तुम्ही परीक्षक आहात, पाहा तपासून.’

फाड्दिशी गोरोबांनी आपलं थापटणं निवृत्तिनाथांच्या डोक्यावर मारलं! केवढा तरी आवाज झाला. शेजारचे कळवळले. पण निवृत्तिनाथांच्या मुखावाटे हू की चू नाही? ते होते तसे बसून राहिले.

नामदेव हे आक्रीत पाहात होता. त्याला हा गोंधळ काही उलगडेना झाला. त्याला दिसलं, की गोरोबा तसेच पुढं ज्ञानोबाकडे वळले. त्यांनी तोच प्रश्न ज्ञानोबांना पुसला. ते केवळ हसले. गोरोबांनी थापटणं ज्ञानोबांच्या मस्तकी हाणलं. त्यांच्या मुद्रेवर इवलासा देखील सल उमटला नाही. गोरोबा म्हणाले,

‘हा डेरा पक्का भाजलेला आहे. अगदी परब्रह्मपदाला पोचला!’

तोच प्रकार त्यांनी सोपान आणि मुक्ताईच्या बाबतीत केला. हसून मुक्ताई म्हणाली,

‘पाहिलीत आमची परीक्षा? आता हातासरशी नामदेवाचीही पाहून टाका. ते अनायासे इथे आलेच आहेत. परीक्षेविना तसेच राहायला नकोत.’

गोरोबा नामदेवाकडे झेपावले. त्यांनी हातीचं थापटणं नामदेवाच्या डोईवर जोराने हाणले. प्रथम तो गोंधळला. मग डोकं चोळीत संतापानं तांबडा लाल झाला. आक्रंदत म्हणू लागला,

'भले दरोडेखोर कैकाडी आहात रे सगळे! मारून टाकता काय मला?'

घाईघाई तो माघारा वळला, आणि धावत, धापा टाकीत मंदिरात जाऊन पोचला. त्यानं बराच वेळ देवापायी मिठी घातली. सोडीचना. मग तो कसा-बसा थोडा शान्त झाला. मात्र त्याचा या मंडळीवरचा राग अजून विझला नव्हता. तो देवाला म्हणाला,

'देवा, हे तुझे भक्त आहेत की कसाई आहेत सगळे?'

देवानं आश्चर्यानं विचारलं,

'काय झालं, बाबा नामदेवा?'

'अरे मला ठार मारायला निघाले होते.'

'ठार मारायला?'

'नव्हे तर काय?'

'झालं काय, ते तरी सांग!'

'अरे मोठे नामवंत तुझे भक्तभागवत, म्हणून आपला कौतुकानं पाहा-यला गेलो. बघतो तर काय? स्त्री नाही, पुरुष नाही, लहान नाही, मोठं नाही ती लवंगी मिरची, मुक्ताई की काय तिचं नाव—तीही आपली त्या घोळक्यात बसलेली!'

देवानं हसू दाबीत म्हटलं,

'मग पुढं?'

'पुढं काय? सगळे आपले एकमेकांच्या पाया पडत होते! एकमेकांना उराउरी भेटत होते. कोण कुठल्या जातीचा, कोण कुठल्या पातीचा – काही विचार नाही. कुठले कोण महार, चांभार, सोनार, कुंभार, मराठे, बामण—सगळा एकत्र काला! शी शी!'

'पण तुला काय केलं त्यांनी?

'सांगतो ना! आले, आणि आपले माझ्या पायांवर डोकीच टेकू

लागले. म्हणालो, पाया पडले, तर पडू द्या. आपलं काय बिघडतं ? पण मग ती चिमुरडी त्या कुंभारड्या म्हाताऱ्याला म्हणाली–'

'गोरोबा असतील–'

'होय होय ! तोच तो ! त्या थेरड्याला म्हणाली, की मडक्यांची परीक्षा करा. उठला की तो ! आपलं थापटणं ज्याच्या त्याच्या डोक्यावर हाणू लागला अन् ती सगळी खुळी गदगदा हसू लागली. थापटणं हाणलं डोक्यात, तरी हासताहेत.'

'मग तू हसलास की नाही ?'

'मोठ्यानं नाही हसलो, पण मलाही हसू आलंच.'

'मग काय झालं ?'

'मग काय ? तो कुंभार आपला माझ्यापाशी येऊन त्यानं थापटणं माझ्या डोक्यावर उगारलं !'

'मग ?'

'मी नको नको म्हणत होतो, तरी दिला की तडाखा ठेवून !'

'पुढं काय झालं ?'

'अरे त्यांनी सगळ्यांनी मिळून मला ठार सुद्धा मारलं असतं ! पळालो म्हणून वाचलो.'

यावर देव उगामुगा राहिला. काही बोलला नाही. नामा गोंधळला. म्हणाला,

'देवा, कारे काही बोलत नाहीस ?'

देव म्हणाला,

'तसं बोलण्याजोगं फार आहे, नाम्या !'

नामा उसळून म्हणाला,

'काय आहे बोलण्याजोगं ? अरे माझं मडकं कच्चं, असा ओरडा करून सगळे मला भाजायला निघाले होते !'

'खरोखरी तू कच्चाच आहेस, नाम्या !'

अचंब्यानं नामा म्हणाला,

'कच्चा ?'

'होय, कच्चा.'

'कसा तो सांगा बघू?'

'अरे, तुझ्यातला भेद अजून गेला नाही. हा महार, हा चांभार, हा शिंपी–हे सगळे माणसानं रचलेले. ते तू घट्ट धरून ठेवले आहेस.'

'मला काय करायचं आहे त्याशी? तू तर माझ्याशी बोलतोस ना?'

'हेच वेडेपण आहे तुझं. लहानपणी तू तो खुळा हट्ट केला होतास, म्हणून मी तू आणलेलं जेवलो. तू तेवढंच धरून बसला आहेस. त्या परतं तू काही ओळखीतच नाहीस. बाकी सगळं तुझ्यासाठी लटकं आहे. पण तू जे हे माझं रूप मनी धरून बसला आहेस, ते काही सर्वस्वी खरं नव्हे. माझ्या भक्तांसाठी अंगिकारलेला तो एक आभास आहे.'

नवलानं तोंड हातानं झाकीत नामदेव म्हणाला,

'काय सांगतोस, देवा? हे तुझं कटीवर कर ठेऊन उभं असलेलं गोजिर-वाणं रूप–हा केवळ आभास आहे?'

'नाम्या, केवळ याच रूपामध्ये मी साठवलेला आहे, हा आभासच आहे. अरे, मी तर या सर्व चर आणि अचर जगतामध्ये सामावलेला आहे. वृक्ष, नद्या, आकाश, स्त्रिया, पुरुष, महार, चांभार ही सगळी रूपं धरून मीच वावरतो आहे.'

नामदेव टकटका देवाकडे बघू लागला. त्याला काहीही सुचेना. थोड्या वेळानं तो म्हणाला,

'देवा, मला हे काही कळत नाही.'

'म्हणूनच सन्त म्हणतात, की तुझं मडकं कच्चं आहे.'

रडवेला होऊन नामदेव म्हणाला,

'तर मग आता मी काय करू?'

'तू कुण्या सन्ताला शरण जा. तो सत्पुरुष तुला शाहाणं करील.'

'कुठं शोधू मी माझा हा गुरू?'

'औंढ्या नागनाथ नामक तीर्थ आहे. तिथं तुला विसोबा खेचर भेट-तील. ते तुला उपदेश देतील.'

ना... ३

## १४. गुरुकृपा—

मराठवाड्यातलं औंढ्या नागनाथ. तिथं द्वादशज्योतिर्लिंगांपैकी एक शिवलिंग आहे. नामा तिथं आला. व्याकुळ होऊन तो विसोबा खेचरांना शोधू लागला.

जेवण नाही, खाणं नाही; उपासातापासा नामा श्रीगुरूचा शोध घेत हिंडतो आहे. मनी एकच तळमळ. मला श्रीगुरू भेटतील का? पावन करून घेतील का?

इकडे विचारतो आहे; तिकडे विचारतो आहे; [कुणी विसोबा खेचरांचं नाव माहीत असल्याचं सांगत नाही. वणावणा हिंडून नामा अगदी दमून गेला. एका झाडाखाली घाम पुशीत वसला.

शेवटी देवळातून देवपूजा उरकून एक भक्त येताना दिसला. त्याला नामानं पुसलं,

'काय हो, इथं कुणी विसोबा खेचर आहेत का?'

'कोण म्हणालात?'

'विसोवा खेचर!'

'हां हां! विसोबा नावाचा एक म्हातारा तिथं देऊळवाड्यात आलाय. तिथंच राहातो तो.'

नामा उठून धावत सुटला. देउळवाड्यात शिरला. तिथं महादेवाचं भलं प्रचण्ड देऊळ. भवताली लहान लहान देवळं. महादेवाचीच.

चहू बाजूस तपास करता एका लहानग्या देवळात नामाला एक म्हातारा माणूस दिसला.

पण कसा?

तर महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेला!

नामयाचं मस्तक संतापानं अगदी फिरून गेलं. काय हे! देवाच्या पिंडीवर पाय, हा काय फाजीलपणा?

तो ओरडून म्हणाला,



‘ अहो म्हातारबुवा ! देवाच्या पिंडीवरचा पाय तेवढा बाजूला करा की ! ’

म्हातारा डोळे मिटून पडला होता. त्यानं डोळे उघडून नामदेवाकडे पाहिलं. मग तो खंगलेल्या स्वरात म्हणाला,

‘ काय म्हणतो आहेस, बाबा ? ’

‘ अहो तो देवाच्या पिंडीवरचा पाय ! तुम्हांला एवढंही कसं कळत नाही ? ’

म्हाताऱ्यानं म्हटलं,

‘ बाळा, मी अगदी दमून गेलो आहे. माझ्याच्यानं काही पाय उचलवत नाही. तू तेवढा, उचलून देव नसेल अश्या जागी ठेव ना ! ’

नामयानं धसमुसळेपणानं म्हाताऱ्याचा पाय पिंडीवरून उचलला, आणि तो दुसरीकडे ठेवला. तो केवढं नवल ! तिथंही एक पिंड त्याला दिसली. चमकून त्यानं पाय तिसरीकडे हलवला, तिथंही एक पिंडी. जिथं तो पाय ठेवू जाई, तिथं त्याला पिंडीच दिसे !

गोंधळून जाऊन शेवटी नामयानं तो पाय आपल्या छातीशी धरून ठेवला. म्हातारा इवलं हसून त्याच्याकडे पाहू लागला.

शेवटी नामयानं आपल्या गुरूला ओळखलं !

---

## १८. देवाची ओळख—

नामदेवांची जगाकडे पाहायची दृष्टीच बदलली.

त्या क्षणापर्यंत त्यांना वाटत होतं, की देव विटेवर काय तो उभा आहे. त्यावेगळा तो कुठंही नाही.

विसोबा खेचरांशी त्यांची भेट झाली. दोघांचं हितगूज झालं. खेचरांनी नामदेवांच्या मस्तकी हात ठेवला, त्यांना उपदेश केला, खऱ्या देवाची ओळख

करून दिली. देव कुण्या एकाच जागी राहातो, असं नाही. तो हे सगळं विश्व व्यापून याहीपलीकडे दशांगुळं उरला आहे, हे खेचरांनी नामदेवांना पटवून दिलं.

आणि नामदेवांसाठी उजाडलं. त्यांना सगळीकडे हरी दिसू लागला. आत हरी. बाहेर हरी. सगळं जग त्यानं कोंदलं आहे.

श्रीगुरूची आज्ञा घेऊन नामदेव पंढरपुरी परतले, त्या दिवशी एकादशी होती.

दुसरे दिवशी उपास सोडण्यासाठी नामदेवांनी चंद्रभागेच्या वाळवंटात स्वयंपाक केला. पोळ्या केल्या. वरण केलं. तुपाची वाटी झाकून ठेवली. मग पिण्यासाठी पाणी आणण्याकरिता ते चन्द्रभागेच्या प्रवाहापाशी गेले.

तोवर एक कुत्रं स्वयंपाकापाशी आलं, आणि पोळ्यांची चवड उचलून पळू लागलं. नामदेवांनी ते पाहिलं. ते धावत स्वयंपाकाजवळ आले, आणि तुपाची वाटी हाती घेऊन कुत्र्यामागे लागले. म्हणू लागले,

'अरे राजा थांब ना ! कोरड्या बिना तुपाच्या पोळ्या खाशील, तर तुझ्या पोटात दुखेल. त्यांना तूप लावू दे, मग खा !'

आश्चर्य केवढं ! कुत्रं दिसेना झालं. पांडुरंग परमात्मा प्रगटला. तो हासून म्हणाला,

'नामया कसं रे ओळखलं ? पशुपक्ष्यांमध्येही मीच आहे, हे तुझ्या ध्यानी आलं तरी कसं ?'

नामदेव नम्र होऊन म्हणाले,

'अरे देवा, ही जी नवी दृष्टी मिळाली ना मला ? ती माझ्या श्रीगुरूंनी मला दिली बघ !'

'काय सांगितलं त्यांनी ?'

'सांगितलं, की तू सर्वव्यापी आहेस.'

'म्हणूनच कालपासून देवळात आला नाहीस वाटतं ?'

यावर नामदेव थोडं हसले आणि आणखीनच नम्र होऊन उभे राहिले.

## १६. कीर्तनाचा रंग—

नामदेवांच्या मनी एक सल होता.

आपण ज्ञानोबा–निवृत्ति–सोपान–मुक्ताबाई या भावंडांशी बरे वागलो नाही.

ती सगळी पंढरीला येताच नामदेवांनी त्यांच्या पायीं लोटांगण घातलं. ज्ञानोबानं ओळखलं, की हा नामा अगदी नवा आहे. पूर्वीच्या अहंकारी नाम्याशी याचा काही संबंध उरला नाही.

मग काय ! पंढरीच्या वाळवंटी भजनाकीर्तनांचा एकच आनंद उसळू लागला. कधी ज्ञानदेवांनी कीर्तनं करावं. या सर्वांनी टाळ घेऊन मागं उभं राहावं.

एकदा काल्याचं कीर्तन. सगळ्यांनी आग्रह केला, की आज नामदेवांनी कीर्तनासाठी उभं ठाकावं. मोठ्या संकोचानं नामदेव कीर्तनाला उभे राहिले. त्यांनी गोकुळात यमुनेकाठी श्रीहरीनं गोपाळासवे केलेल्या काल्याचं वर्णन सुरू केलं.

मग उभे असलेले सगळे वारकरी घुळघुळा टाळ वाजूवू लागले. टाळ्या पिटू लागले. ज्ञानोबा स्वतः त्यांना लाह्या वाटू लागले. हात पुढं करता करता सगळा आनंद कल्लोळ उसळला.

स्वतः पांडुरंगाच्यानंही राहवेना. तोही वाळवंटात आला, आणि कीर्तन रंगात रंगून जाऊन नाचू लागला. जनीनं त्याला नाचताना पाहिलं, आणि ज्ञानोबांना म्हणाली,

‘ ज्ञानदेवा, स्वतः देव नाचतोय बघा ! एक छानदार अभंग म्हणा ना !’

**नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग**
**जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ॥**

ज्ञानोबा अभंग म्हणू लागले—

तुझी आण वाहिन गा देवराया
बहु आवडसी जीवापासोनिया ॥
कानडिया विठोबा कानडिया
बहु आवडसी जीवापासोनियां ॥
बाप रखुमादेवीवरा विठ्ठलुराया
बहु आवडसी जीवापासोनियां ॥

जनीनं ते सगळं पाहिलं, आणि गहिवरून जाऊन तिनं संतांपायी लोटांगण घातलं !

---

## १७. तीर्थयात्रा—

ज्ञानोबांनी नामदेवांना म्हटलं,

‘ नामदेवा, तुझं जीवन धन्य झालं. प्रत्यक्ष देव तू आपला सखा केलास. यापरतं आता मिळविण्याजोगं काही उरलं नाही. ’

नामदेवांनी ज्ञानोबांच्या चरणी मिठी घालीत म्हटलं,

‘ स्वामी, आपण हे म्हणावं, यांत सगळं पावलं, यापरतं काही नको. ’

ज्ञानोबांनी नामदेवांना उठवून आलिंगन दिलं. म्हणाले,

‘ नामया, मनी एक इच्छा आहे. ’

‘ आज्ञा व्हावी. ’

इथं भवताली पुष्कळ माणसं असतात. मनाजोगं बोलता येत नाही. तू आणि मी, दोघेच असावेत. अन्तरीचं भक्तीचं रहस्य एकमेकांशी अनुवादता यावं— ’

‘ त्यासाठी काय बरं करता येईल ? ’

‘ कितीही मोठा भक्त असला, तरी त्यानं तीर्थ पाहाणं त्यागू नये. नाना स्थळं. नाना दैवतं. श्रीहरीच्या नाना भक्तांच्या भेटी होतात. हरिचर्चा घडते.

तेंव्हां आपण दोघांनी मिळून तीर्थयात्रा करावी, असा बेत आहे.'

नामदेवांनी विचार केला, की पांडुरंगाच्या पायाजवळ बसलो आहे. अनेक सन्त महंत इथं येतात. त्यांचं दर्शन होतं. ज्ञानोबांचं दर्शन इथंच नाही का झालं? तेंव्हा सन्तदर्शनासाठी दुसरीकडे जायची गरज नाही.

पण आपण आपलं पांडुरंगाला पुसावं ते बरं.

ते ज्ञानोबांना म्हणाले,

'माउली, आपण असं करू या का?

'कसं?'

'श्रीहरि पांडुरंगाला विचारून ठरवू या.'

दोघे राउळात पांडुरंगापाशी आले. चरणी मस्तक टेवलं. पाडुरंगानं दोघांनाही मिठी घातली. मग म्हणाला,

'काय बेत रचला तुम्ही दोघांनी?'

ज्ञानोबांनी आपल्या मनाचा हेतू सांगितला. आइकून देव हासला. ज्ञानोबांना म्हणाला,

'अरे, तू स्फटिकासारखा आतबाहेर शुद्ध आहेस. सगळ्या तीर्थांचं तीर्थ तू स्वतःच आहेस. आणखी नवं तीर्थाटन काय करायचं?'

ज्ञानदेवानं म्हटलं,

'मनुष्यशरीर आहे ना? हे आळसानं उगीचच सुखावतं. ते थोडं कष्टवावं. आणि दुसरं असं, की नामदेवांच्या संगतीचा लाभ घ्यावा म्हणतो.'

देवानं कौतुकानं म्हटलं,

'नामया, हा प्रत्यक्ष परब्रह्मरूप ज्ञानेश्वर! हा तुझ्या संगतीची इच्छा धरतो आहे. तेव्हा जा बावा! एक करा, आम्हांला विसरू नका म्हणजे झालं.'

मग ज्ञानोबांकडे वळून देव म्हणाला,

'ज्ञानोबा, हे माझं येडंबागडं साधंभोळं आहे. माझ्या वेगळा याला कसलाही छंद नाही. तेव्हा याला सांभाळून परत आण म्हणजे झालं.'

ज्ञानोबा अन् नामदेवांनी पुनः पांडुरंगाच्या चरणी मस्तक टेकवलं. चन्द्रभागेवर आले. स्नान उरकलं. पुंडलीकाचं दर्शन घेतलं मग चंद्रभागा ओलांडून ते यात्रेला निघाले.

म. ग्रं. सं. ठाणे
वा. क्र. ५८७४
वि.
ता. ५.५५

## १८. उचंबळे कूप—

नाशिक, त्र्यंबक, हरिश्चन्द्र पर्वत, असं एक एक पाहात ते दोघे पश्चिमेकडे वळले. द्वारका, प्रयाग, इत्यादी तीर्थं त्यांनी पाहिली, नरसी मेहेत्यासारख्या गुजराती भाषिक सन्तमन्डळींच्या भेटी झाल्या. नामदेवांच्या ध्यानी आलं की, भाषा असेना का निराळी, श्रीहरिदर्शनाविषयीचा प्रेमा एकच आहे. त्यात कुठे लवलेश फरक नाही !

तिथून ते दोघे राजस्थानात वळले. सिद्धपूर, अबूपर्वत, एकलिंगजी, असं पाहात ते वाळवंटी प्रदेशात शिरले.

मार्गी चालत असता दोघांचे संवाद होत. दोघांचंही आराध्ये एक. साधनापंथ एक. भाषा एक. चर्चा करता करता दोघांच्याही डोळ्यांवाटे आनंदाची आसवं वाहात. स्थळकाळाचं भान दोघांनाही उरत नसे.

एक्या दिवशी वाळवंट तुडवीत ते वाटेनं निघाले. ऊन्ह चटाचटा तापू लागलं. कुठं झाड नाही, की झुडूप नाही. सगळी वाळूच. खूप तहान लागली. काय करावं कळेना.

शेवटी बहुत चालून गेल्यावर थोडकी हिरवळ आणि तिच्या मध्यभागी एक अगदी लहानशी विहीर दिसली. अगदी चिंचोळी. खूप खोल.

दोघेही आत डोकावून पाहू लागले. तळाशी पाण्याचा चान्दवा दिसला पण पाणी शेंदायचं कसं ? दोरी नाही की पोहरा नाही. जवळ कुण्या घराचा वास सुद्धा नाही.

नामदेवांनी म्हटलं,

'काय करायचं स्वामी आता ?'

ज्ञानोबा हसून बोलले,

'मी आत उतरू शकतो, नामदेवा ! लघिमा नावाची सिद्धी आहे. तिच्या साहाय्यानं मी लहानगं रूप धरून आत जाऊन पाणी पिऊन येतो.'

नवलानं नामदेवांनी म्हटलं,

'जा बघू !'

तत्क्षणी सिद्धीच्या बळानं ज्ञानदेव लहान झाले. आणि पाणी पिऊन वर आले. नामदेवांनी त्यांचे चरण स्पर्शून म्हटलं,

'तुम्हांला काहीही शक्य आहे, ज्ञानदेवा !'

'ते असू दे, तुझं कसं ?'

'माझं ?'

'मी पुन: आत उतरून तुझ्यासाठी पाणी आणू देतो.'

नामदेवांनी ज्ञानोबांचा हात धरला. अचंब्यानं ज्ञानोबांनी पुसलं,

'काय झालं, नामदेवा ?'

'झालं काहीच नाही, माझ्यासाठी आपण कष्ट घेऊ नका.'

'तुला तहान नाही लागली का ?'

'लागली आहे, पण माझा भार पांडुरंगावर आहे. तो माझ्यासाठी काही-तरी करीलच.'

नामदेवांनी निर्वाणीचं आसन मांडलं. मनी म्हणू लागले,

'रे श्रीहरि, मी तर तुझं येडंबागडंच आहे. तुझ्यापाशी हट्ट न करू, तर कुणाशी करू ?

'तू कोणे एकेकाळी गजेन्द्रासाठी धावत आलास.

'द्रौपदीनं तुला हाक घालताच तू तिला वस्त्र पुरविलीस.

'मग मीही तुला हाक मारतो आहे.

'पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, ही तुझीच रूपं आहेत.

'तर मग माझ्यासाठी जळरूप होऊन माझी तहान भागव.'

आणि काय आश्चर्य !

ती चिंचोळी विहीर भरून जाऊन पाणी वर वाहू लागलं !



## १९. फिरविले देऊळ—

ते दोघे दक्षिणेत परतण्यापूर्वी काशी, गया, प्रयागास जाऊन आले. परतत असता नामदेवांनी आपल्याला गुरूपदेशाची कथा ज्ञानोबांना आईकिवली.

ज्ञानोबा म्हणाले,

'नामया, आपण नागनाथाला जाऊ या की! जिथं तुला श्रीगुरू भेटले, ते स्थान पाहावं, असं मनी आहे.'

दोघे औंढ्या नागनाथास आले. ऐन यात्रेच्या दिवशी दर्शन झालं. रात्री ज्ञानोबांनी नामदेवांना म्हटलं,

'नामदेवा, आज रात्री तुम्ही देवासमोर कीर्तन करा!'

रात्री नामदेव कीर्तनासाठी उभे राहिले. खूप भक्त जमले. देवासमोरचं पटांगण गच्च भरून गेलं.

नामदेवांनी हरिहर एकता वर्णायला सुरवात केली. म्हणाले,

'—बरं का मंडळी, हे दोघे मिळून एकच आहेत. शिव काय आणि विष्णू काय! दोघांमध्ये भेद मानू नका.'

'—तुम्हाला माहीत आहे का? शंभू कापरासारखा गोरा आहे. काय म्हणून? तर विष्णूनं शुभ्र अमृताचं सेवन केलं म्हणून. आणि महादेवानं काळं निळं विष प्राशन केलं.

'—परिणाम कुणावर झाला? विष्णूवर. त्याचा रंग निळा झाला! अशीती गंमत आहे.

भजन करा रे हरिहरा
नारायण शिवशंकरा
माझें बोलणें अवधारा
भेद न करा दोघांचा ॥
तुम्हासी सांगेन सत्य वृत्तांत

पाहें पां तेथींचा दृष्टांत
नारायणें सेविलें अमृत
झाला श्वेत महादेव ॥
शंभुने गिळिलें हळाहळा
म्हणुनि विष्णु झाला निळा ॥

शिवरात्रीचा मुहूर्त साधायचा होता. देवाला अभिषेक करायचा होता. देवाचे पुजारी सोवळी नेसून मंदिराकडे येऊ लागले. पाहतात, तो नामदेवाचं कीर्तन चाललेलं. पाऊल ठेवायला कुठं जागा नाही.

ते संतापून नामदेवांना म्हणाले,

'ए संताळ्या ! बंद कर तुझं कीर्तन. देवळासमोर काय मांडली आहेस टाळकुटी ?'

नामदेवांनी पुसलं,

'तर मग कुठं करू भजन ?'

'हवं तिथं कर. देवळामागं का करीनास ! चल, चालता हो !'

नामदेव ज्ञानोबांसह राउळामागं गेले, आणि तिथं त्यांनी भजनाचा फड मांडला. पुजाऱ्यांनी निश्चिंत मनानं देवावर अभिषेक सुरू केला. रात्रभर रुद्राची आवर्तनं चालली होती. पहाटेस आवर्तनं संपवून पुजारीमंडळी बाहेर पडू लागली—

केवढं आश्चर्य ? देवानं देऊळ फिरवलं होतं ! सगळं देऊळ. नामदेवांच्या राउळामागील कीर्तनाला देव सामोरा झाला होता.

---

## २०. ज्ञानोबा-समाधी—

दोघे पंढरीस परतले......देवानं मोठ्या कौतुकानं.... त्यांना जवळ घेतलं. त्यांचं कुशल पुसलं. मोठं मावंदं घालून यात्रेची समाप्ती केली. सगळे साधूसन्त जेवून धापले.

नामदेवांना वाटलं होतं, की ज्ञानोबा आता बहुत दिवसपर्यंत आपणांसवे राहातील. काळ फार सुखात जाईल.

पण ज्ञानोबांच्या मनी वेगळं होतं.

एके दिवशी त्यांनी आपल्या मनीचा हेतू प्रगट केला. ते देवाला म्हणाले,

'श्रीहरि, आता इहलोकीचं वास्तव्य पुरे झालं. समाधी घ्यावीसं वाटू लागलं आहे.'

ज्ञानोबांचा तो निश्चय ऐकून नामदेव, मुक्ताई, सोपान, या सर्वांवर जणू वीजच कोसळली.

अवघे खन्त करू लागले. ज्ञानोबांनी समाधीचं म्हटलं, आणि ओठ मिटून घेतले. अर्थ स्पष्ट होता. आता ज्ञानोबांच्या शब्दांत बदल होणार नव्हता.

गहिंवर कसाबसा आवरून नामदेव देवाला म्हणाले,

'श्रीहरि, आता ज्ञानोबा आम्हांमध्ये असणार नाही का?'

देवानं म्हटलं,

> **ज्ञानदेवें घेतली जे आळी ।**
> **ते सिध्दीतें पावेल ॥**

'ज्ञानोबानं हट्ट केला आहे. जन्मात कधी केला नाही, तो आता केला आहे. तेव्हा मला तो पुरविला पाहिजे.'

छातीवर जणू दगड ठेवून नामदेवांनी पुसलं,

'ज्ञानोबांसाठी समाधिस्थळ कुठं योजलं?'

'आळंदी! जिथं ही मुलं जन्मली, लहानाची मोठी झाली, तेच ज्ञानोबाचं समाधिस्थळ.

> **कृतायुगीं क्षेत्र आदि ।**
> **ज्ञानदेवा तेथें समाधि ।**
> **देव सांगतसे शुद्धी ।**
> **योगबुद्धी जुनाट ॥**
> **एसे भक्तराज श्रेष्ठ ।**

भूमि नामें वैकुंठपीठ
तें हे अलंकापुरी श्रेष्ठ ।
आदि वरिष्ठ पीठ आठरा ॥
इंद्रायणी दक्षिण वाहिनी ।
भागिरथी मणिकर्णिका दोन्ही ।
ह्या मिळालिया त्रिसंगमीं ।
पुण्यभूमि पवित्र ते ॥

‘ ते बहुत प्राचीन तीर्थ. तिथं कधी काळीपासून सिद्धेश्वर आसन मांडून बसला आहे. कित्येक योग्यांनी तिथं तपश्चर्या केली आहे. इंद्रायणी त्या स्थळी दक्षिणेकडे वाहते. तिथं तिला मणिकर्णिका आणि भागिरथी अशा दोन नद्या मिळतात. त्या स्थळी ज्ञानोबांनी समाधी घ्यावी. ’

---

## २१. दीप मावळला—

कार्तिकाचा वद्य पक्ष. एकादशी उलटून गेली. सगळी रात्र हरिस्मरणात संपली. आळंदीचं इन्द्रायणी तीर पताकांनीं भगवं झालं आहे.

ज्ञानोबा, निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, त्यांचे मुलगे नारा, विठा, गोंदा, महादा. जनाबाईही आली आहे. विसोबा खेचर, वटेश्वर चांगदेव, सावता माळी, गोरा कुंभार, परिसा भागवत.

नामदेवांना अपार दुःख होतं आहे.

जय शब्दे नामा बोभाये ।
केशवा वा त्राहे त्राहे ।
मी व्याकूळ होता हे ।
ज्ञानदेवा कारणें ॥

आतां मज तू सांभाळीं ।
ज्ञानदेवावीण सदाकाळीं ।

मज न कंठे निशी मंडळीं ।
भानुसहित वर्तता ।
तु माझी जनक जननी ।
परि ज्ञानदेवावीण मेदिनी ।
शून्य वाटे मज लागोनी ।
जैसे मत्स्य जीवनेंवीण ।।
तु रक्षिता सर्व जीवांसी।
तरी कां दु:ख दिधलें आम्हासी ।
तूं जवळी असता हृषीकेशी ।।
ऐसी दशा हे प्राप्त ।।
नामा खेदे क्षीण झाला जीवे ।
तंव नेत्र उघडिले देवे ।
आलिंगिला केशवें ।
च्यारी भुजा पसरुनी ।।

'देवा, ज्ञानोबांचा विरह मी सहन तरी कसा करू? त्यांच्याविना प्राण अगदी व्याकुळ होताहेत. दिवस उगवतील. रात्री येतील. पण ज्ञानदेव असणार नाहीत. देवा, तू तर माझी जणू आईच आहेस. पण ज्ञानोबा ? तो माझं सर्वस्व! सगळं शून्य भासू लागलं आहे. मासा पाण्याबाहेर काढून टाकावा, ती गत झाली आहे.

'अरे, सगळ्यांचं दु:ख दूर करणारा तू इथं उपस्थित आहेस ना ? मग आम्हांला हे कां भोगावं लागतं आहे ?'

देवानं नामदेवांना चहूं भुजांनी अलिंगिलं, आणि म्हणाला,

'नामदेवा, अरे ज्ञानोबा कैवल्याचा पुतळा आहे. तो कुठून येतही नाही आणि कुठं जातही नाही. त्याच्यासाठी शोक करायचा नसतो. चला आवरा, समाधीची वेळ टळता कामा नये. समाधीची जागा झाडून काढा.'

नामदेवांनी आपला शोक आवरला. नारा–विठाला हाक मारली. म्हटलं,

'साहित्य आणलं का रे बाबांनो ?'

'आणलं. तुळशी, बेल, दर्भफुलं—'

'चला, समाधीचा ठाव झाडून स्वच्छ करा.'

योजल्या गुहेत मुलं शिरली. गुहा झाडून स्वच्छ केली. तळवटी दर्भ आंथरले. वर मृगाजिन मांडलं. त्यावर धुतल्या वस्त्राची घडी. घडीवर बेलाची पानं, तुळशीपत्रं, फुलं. समोर तुपाची दिवली पेटवली.

असं सगळं उरकून मुलं परतली. सगळे संत सद्गदित होऊन ज्ञानोबांच्या भवती एकत्र झाले. नामदेव म्हणाले,

'एक्या अंगास सरा. त्या भावंडांना हितगूज करू द्या.'

एवढे उदासीन निवृत्तिनाथ, पण तेही स्फुंदू लागले. मुक्ताईनं तर जमिनीवर घालून घेतलं. देव, रखुमादेवी आणि साधुजनांनी निवृत्तिनाथांचं समाधान करीत म्हटलं,

'निवृत्तिनाथा, तुम्हीच असा धीर सोडल्यावर अज्ञजनांनी काय करावं बरं?'

**देव रुक्माबाई आणि साधुजन**
**करिती समाधान निवृत्तींचें ॥**
**ज्ञानियांनीं ऐसी करावी जंव खंती ।**
**अज्ञानाचा किती पाड आला ॥**

शेवटी पांडुरंगानं ज्ञानोबांना हाताला धरून चालवलं. समाधिस्थळी नेलं. दोघेही आत उतरले. ज्ञानोबांना समाधीच्या स्थळी बसवून देव वर आले आणि त्यांनी समाधीवर शिळा बसवली. नामदेव आक्रंदून म्हणाले,

'माझा बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ झाला, आता सूर्य असून नसून सारखाच!'

**नामा म्हणे आतां लोपला दिनकर ।**
**बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ॥**

## २२. राहिल्या त्या कीर्ती—

नारा, विठा, गोंदा, महादा अवघे जण आळंदीहून सासवडास चालले. तिथं सोपानदेव समाधी घेणार होते. नामदेवांना भरभरून येत होतं. ही लहान लहान मुलं उदासीनपणं समाधिस्थ होताहेत. आपण मात्र ठोंब्यासारखे मागं राहाताहोत !

सोपानाला जेव्हा देवानं समाधीकडे चालवलं, तेव्हा नामदेवांना रडू आवरेना. ते मोठमोठ्याने आक्रंदू लागले. ते म्हणाले, की एकेक चिरा निखळतो आहे.

**सोपानाची बोळवण करितसे हरी ।**
**दीर्घध्वनि करी नामदेव ॥**

सगळे उदासवाणे सन्त आणि वारकरी मुक्ताई अन् निवृत्तिनाथ यांना घेऊन नेवाशाला आले. ज्ञानोबांनी ज्ञानेश्वरी सांगितरी, ते स्थळ पाहून सर्वांना भरभरून आलं. मुक्ताई तर अगदी बोलेना झाली. तिनं अन्नपाणी त्यागलं.

**मुक्ताई उदासी झाली असे फार ।**
**आतां हें शरीर रक्षूं नये ॥**
**त्यागिले आहार अन्नपाणी सकळी ॥**

तिथून ते अवघे तापीतीरावर आले. निवृत्तिनाथांनी मुक्ताईला धरून चालवलं होतं. सोमेश्वराचं देऊळ आलं. तो प्रचण्ड वादळ सुटलं. विजा कडाडू लागल्या. धुवाधार पाऊस कोसळू लागला. अन् एका विजेच्या कल्लोळाबरोबर मुक्ताई गुप्त झाली.

**कडाडली वीज निरंजनीं जेव्हां ।**
**मुक्ताबाई तेव्हां गुप्त झाली ॥**

नामदेवांना एकच दुःख. जाण्यापूर्वी मुक्ताई आम्हांशी शब्दही बोलली नाही.



**नामा म्हणे देवा कैंचे आतां कांहीं ।**
**आम्हां मुक्ताबाई बोलली नाहीं ॥**

निवृत्तिनाथांनी सगळ्या धाकुट्यांना निरवलं, आणि त्र्यंबकेश्वरी आपणही समाधी घेतली. उदास नामदेव म्हणाले,

'या ईश्वरी विभूती गेल्या, मागं कीर्ती मात्र राहिली. वैराग्य वैराग्य असं आतापर्यंत ऐकत होतो. पण या चौघांसारखं वैराग्य कुठं पाहिलं नाही. आता असं कुणी होणार नाही. ज्ञान सांगणारे लाख जण असतील. पण निवृत्तिनाथांची पद्धत ते कुठून आणतील ? कुणी म्हणेल, की आम्ही परब्रह्माची भेट घडवतो. पण त्यांची तुलना ज्ञानोबांशी करता येईल का ? सोपानासारखं एकान्ताचं सुख कुणासंगं अनुभवता येईल ? आणि मुक्ताईविषयी काय सांगावं ? ते बोलण्या-पलिकडलं आहे.

**गेले दिगंबर ईश्वर विभूती ।**
**राहिल्या त्या कीर्ती जगामाजीं ॥**
**वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं ।**
**आतां ऐसें कोणी होणें नाहीं ॥**
**सांगतील ज्ञान म्हणतील खूण ।**
**नयेचि साधन निवृत्तीचें ॥**
**परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती ।**
**कोणा नये युक्ती ज्ञानोबाची ॥**
**करतील अर्थ सांगतील परमार्थ ।**
**नये पां एकान्त सोपानाचा ॥**
**नामा म्हणे देवा सांगोनियां काई ।**
**नये मुक्ताबाई गुह्य तुझें ॥**

# २३. अभंगरचना—

नामदेवांची अभंगरचना सुरूच होती.

त्यांनी हजारो अभंग रचून ठेवले. त्यांच्यांत किती किती प्रकार आहेत, किती पौराणिक कथानकं आहेत. शिवस्तुती आहे. तुळसीमाहात्म्य आहे. गंगा-वर्णन आहे. संतमहिमा आहे. नवविधाभक्ती आहे. कलिप्रभाव आहे. जनांस उपदेश आहे.

याही वेगळी रूपकं आहेत. गोंधळ, पांगूळ, वासुदेव, पिंगळा, कूट असे किती प्रकार.

ते अभंग अतिशय सोपे आहेत. रसाळ आहेत. प्रासादिक आहेत. त्यांनी एक खेळिया लिहिला आहे. त्याची भाषा तर अगदी मजेदार आहे. मोठमोठे हे जणू आपले खेळगडी आहेत, असं कल्पून ते म्हणतात—

ऐक खेळिया तुज सांगितलें
ऐसें जाणुनि खेळ खेळें रे ॥
बामणाचें पोर एक खेळासि भ्यालें तें
बारा वर्षे लपलें रे ।
कापत कापत बाहरी आलें तें
नागवेंचि पळून गेलें रे ॥
चहूं तोंड्याचा पोर एक नाऱ्याहि जाणतो
खेळियांमाजीं आगळा रे ।
कुचाळी करूनी पोरें भांडवी
आपण राही वेगळा रे ॥
गंगा गौरी दोघी भांडवी
संभ्यासि धाडिलें वना रे
खेळ खेळे परि डाईं न सांपडे
तो एक खेळिया शाहाणा रे ॥
यादवाचा पोर एक गोऱ्या भला

तें बहुतचि खेळ खेळला रे ।
लहान थोरें अवघीं मारिलीं
खेळचि मोडून गेला रे ॥

शुक, नारद, महादेव, श्रीकृष्ण कुणाकुणाला नामदेवांनी या अभंगात वगळलं नाही. एका कूट अभंगात तर त्यांनी फारच गंमत केली.

आम्हीं लटके ना बोलों वर्तमान खोटें

अशी एकीकडे प्रतिज्ञा केली, आणि मग काय म्हणतात की—

मुंगी व्याली शिंगी झाली, तिचें दूध किती ?
सतरा रांजण भरून गेले, प्याले बारा हत्ती ॥
शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी,
उंदीर गेले देशांतरी, ताकें भरल्या गोणी ॥

पण याहूनही अधिक रसमय, अधिक प्रासादिक अभंग आहेत गोकुळातल्या श्रीकृष्ण लीलांचे.

यशोदेकडे गवळणी श्रीकृष्णाच्या तक्रारी घेऊन आल्या. तर ती म्हणते,

बाळ सगुण गुणाचें तान्हें ।
बाळ दिसतें गोजिरवाणें ।
काय सांगतां गाऱ्हाणें ग
गोकुळच्या नारी ॥
सांवळा ग चिमणा माझा
गौळणींत खेळे राजा
तुम्ही मोठ्या ढालगजा ग
गोकुळच्या नारी ॥
तुम्ही खाऊनि लोण्याचा गोळा
आळ घेतां या गोपाळा
तुम्ही ठायींच्या वोढाळा गे
गोकुळच्या नारी ॥

भक्तीच्या प्रांती शिरले, की सगळी दृश्यं जशी नामदेवांच्या दृष्टीसमोर उभी राहातात. त्यांची एक भूपाळी अगदी चित्रमय आहे.

उठा पांडुरंगा, आतां दर्शन द्या सकळां ।
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा ॥
संत साधू मुनी अवघे झालेती गोळा
सोडा शेज सुख आतां पाहूं द्या मुखकमळा ॥
रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी
मन उतावीळ रूप पाहावया दृष्टी ॥
राही रखुमाबाई, तुम्हां येऊं द्या दया
शेजे हालवोनी जागें करा देवराया ॥
गरुड हनुमंत पुढें पाहाती वाट
स्वर्गीचे सुरवर आले घेवोनी बोभाट ॥
झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा
विष्णुदास नामा उभा घेवोनी काकडा ॥

संतमंडळींना अहंकाराचा वारा कधीही लागू नये, अशी नामदेवांना मोठी तळमळ लागली आहे. ते म्हणतात,

अकल्प आयुष्य व्हावें तया कुळा ।
माझिया सकळा हरिच्या दासां ॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं ।
ही सन्त मण्डळी सुखी असो ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसां ।
माझिया विष्णुदासां भाविकांसी ॥
नामा म्हणे तयां असावें कल्याण ।
ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥

आणि पांडुरंगाची आरती जर जर कुणाची अतिशय प्रसिद्ध असेल, तर ती नामदेवांची !

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा
पुंडलिकाभेटी परब्रह्म आलें गा
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा

रखुमाई वल्लभा, राहीच्या वल्लभा
पावें जिवलगां ॥
आषाढीं कार्तिकीं भक्तजन येती
चन्द्रभागेमध्यें स्नान ते करिती
दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती
केशवासी नामदेव भावें ओवाळिती ॥

---

## २४. नामा झालासे उदास—

पण ज्ञानोबा समाधिस्थ झाल्या दिसापासून नामदेव अतिशय उदास झाले. ते देवाला म्हणाले,

'आता पुनः ज्ञानदेव दृष्टी पडतील का? तो माझा सखा सुहृद अंतरला, आता पंढरपुरी राहाणंही मला बरं वाटत नाही.'

नामा म्हणे देवा, ज्ञानदेव सृष्टी । पडेल का दृष्टी पुनः आतां ॥
सन्त अन्तरला सखा झाला दूर । आतां पंढरपूर कैसें कंठूं ॥

नामदेवांना ज्ञानोबांच्या संगतीत केलेली उत्तराखंडाची यात्रा आठवू लागली. त्यांचं मन इथून उडालं. एक्या दिशी ते उठले, आणि एकटेच उत्तरेकडे निघाले.

वाटेत किती किती तीर्थं येत. तिथं आपण ज्ञानदेवांबरोबर केलेल्या भक्तीच्या आनंदचर्चा त्यांना आठवत. तेव्हा ज्ञानदेव होते, आता ते नाहीत.

कितीही तत्त्वज्ञानाचा विचार केला, तरी माणूस नसणं हे भयंकर होतं. त्यात तो माणूस कुणी सामान्य नव्हता. ज्ञानियांचा शिरोमणी, चिंतकांचा चिंतामणी, साधकांचा मायबाप असा तो श्रेष्ठ योगी होता. तो आपल्याबरोबर चालत होता. बोलत होता. भक्तीच्या कल्लोळात आपणासवे डुंबत होता. ही तीर्थं पाहून त्याचं मन भरून येत होतं. अशा एकेक आठवणींनी नामदेव विव्हल होत होते. पतंगाची दोरी तुटावी आणि तो कुणीकडे तरी भरकटावा,

अशी त्यांची गत झाली होती.

ते म्हणत—

**ज्ञानदेव पहावा डोळां ॥ ज्ञानदेवा भेटी व्हावी ॥**
**ज्ञानदेवावीण व्याकुळ हे प्राण ॥ ज्ञानदेव माझें सौख्य सरोवर ॥**
**त्यांत जलचर स्वस्थ होतों ॥**

त्यांनी नर्मदा ओलांडली. राजस्थानातला तो कूप पाहिला. ज्ञानेश्वरांच्या योगसामर्थ्याची आठवण होऊन त्यांनी पुन: तिथं आसवं ढाळली. तसेच पुढं ते कुरुक्षेत्री पोचले. इथंच श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीता सांगितली. अन् त्याच गीतेवर माझ्या ज्ञानोबांनी केवढा प्रचण्ड ग्रंथ केला. साध्या भोळ्यांसाठी भवसागरातून उतरून जायला सोपी पायवाट केली.

काय त्या ग्रंथाचं कवतिक ! एकेक ओवी जणू अमृताचं भाण्डार. साच. मवाळ. मितुली. रसाळ.

**नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ॥**

---

## २५. पंजाब यात्रा—

पुढं यमुनातीरावरून नामदेव पंजाबात शिरले. तिथली ती थोराड बांध्याची, साधीभोळी माणसं त्यांना आवडली. त्यांच्यासाठी ते हिंदीत अभंग रचू लागले.

**उत्तम नरतनु पाया रे भाई । गाफिल क्यौं हुआ दिवाने जू ॥**

'अरे, हा उत्तम नरदेह मिळाला आहे, त्याचं काही सार्थक करा. असे गाफील का झाला आहात ?'

'बाबांनो, या प्रपंचरूपी वनाला आग लागली आहे. तीत सापडले असता तुम्ही स्वस्थ कसे बसला आहात ?'

**आग लगी क्या देखत अंधे । कायके खातर सोया जू ॥**

' अरे मनरूपी पाखरा, संसार हे मायाजाळ आहे. तुझ्यासाठी ठायी ठायी पिंजरे मांडले आहेत. त्यात तू सापडू नकोस. '

**मन पंछीया मत पड पींजरे । संसार मायाजाळ रे ।।**

असं पंजाबभर हिंडता फिरता नामदेव गुरुदासपूर जिल्ह्यात आले. तिथं घुमान नावाचं गाव. त्या गावी ते रमले. भवताली भक्त जमले. कथा-कीर्तनांचा कल्लोळ उसळला. नामदेवांवर पंजाबच्या जनांची इतकी श्रद्धा, की शिखांनी त्यांचे किती एक अभंग आपल्या ग्रंथसाहेबात दाखल करून घेतले.

बरीच वर्षं नामदेव तिकडं राहिले. अगदी म्हातारपण दारी उभं राही-पर्यंत. केस पांढरे झाले. एकेका इंद्रियातलं बळ उणावू लागलं. आणि मग त्यांना पुनः पंढरपुराचं स्मरण होऊ लागलं. शरीर ठेवायचं, ते पांडुरंगाच्या पायापाशी, असं त्यांना वाटू लागलं.

अन् मग ते पुनः दक्षिणेत निघाले.

---

## २६. पायरीचे चिरे—

सगळे सखे-स्वजन सोडून गेले होते. तो योग्यांच्या कुळीचा तन्मणी ज्ञानोबा, निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताई यांना तर आपणच निरवून गेलो होतो. त्यावेळी कितीक संत होते. गोरा कुंभार. सावता माळी. विसोबा खेचर. चांग-देवही होते. आता कुणी राहिलं नाही.

उदास नामदेव पंढरपुरी पोचले. पांडुरंगाच्या दर्शनास गेले. घरी सर्वांना कळलं. नारा, विठा, गोंदा, महादा. ते धावत राउळात आले. नामदेवांच्या पाया पडले.

पण नामदेवांचं लक्ष पांडुरंगाच्या चरणी लागलं होतं. वयाची ऐंशी वर्षं उलटून गेली होती. मागं कसलाही पाश उरला नव्हता. ते कुणाशी बोलले



नाहीत. जवळीक दाखवली नाही.

जेवण, खाणं, कशातच त्यांना आसक्ती उरली नाही.

मन हरिचरणी लीन झालं होतं. सगळ्या वृत्ती अन्तर्मुख झाल्या होत्या.

आषाढाचा महिना, वद्य त्रयोदशी. पाऊस धूमधूम कोसळत होता.

नामदेवांच्या मनी एक विचार वळावला. हे शरीर त्यागायचं, ते पांडुरंगाच्या रावळाच्या पायरीपाशी त्यागावं. म्हणजे येत्याजात्या संतसज्जनांच्या पायाची धूळ तरी त्यावर उडेल.

**नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । सन्त पाय हिरे वरी देती ।।**

नामदेव राबळाच्या ओसरीतून उठले. चालवत नाही. तरी पायऱ्यांपर्यंत गेलंच पाहिजे. शरीर मधेच पडता उपयोगाचं नाही.

एकेक क्षण आठवतो आहे.

तो आपला अतिशय लाडका ज्ञानोबा समाधिस्थ झाला, तेव्हा आपण त्याच्या सवे....समाधिस्थलापर्यंत गेलो होतो.

सोपानाबरोबरही.

मुक्ताई—ती तर अकस्मात नाहीशी झाली.

निवृत्तिनाथांनाही आपण समाधीपाशी पोचवलं होतं—

नामदेवांच्या पुढं एकेक दृश्य दिसू लागलं.

त्यांना वाटलं, जणू तो चैतन्यमूर्ती ज्ञानोबाच आपला दण्ड धरून आपल्याला पायऱ्या उतरून खाली नेतो आहे.

एकेक पायरी, एकेक पायरी.

शेवटची पायरी आली. शरीरातलं बळ हारपलं. नामदेव खचून खाली बसले. त्यांनी पायरीवर मस्तक ठेवलं.

त्यांचे प्राण शरीर सोडून निघून गेले.

—त्यांच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 115814 नों. दि
वि. .............. ... क्र. ......
श्री संत नामदेव

IRBK-0115814